

सुधाकरराव कुलकर्णी स्मृती
प्रतिष्ठानच्या

**‘गझलमाला’** या उपक्रमांतर्गत

मराठी गझलसम्राट आदरणीय सुरेश भट यांच्या
जन्मदिनानिमित्त
आयोजित स्पर्धेनिमित्ताने
निवडक स्पर्धकांच्या व मान्यवरांच्या सदिच्छापर
मराठी गझलांचा संग्रह

# मराठी गझल

# समिधा-२०२०

## कोरोनाविरुद्ध

## मराठी गझलकारांचेही योगदान



• Reg.No. : Latur/0000014/2018 (XXI of 1860) • Reg. of Public Trusts - F-0024903 (LTR) (BOM.XXIX of 1950)

# सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान

सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या
**'गझलमाला'** या उपक्रमांतर्गत
मराठी गझलसम्राट आदरणीय सुरेश भट यांच्या जन्मदिनानिमित्त
आयोजित स्पर्धेनिमित्ताने
निवडक स्पर्धकांच्या व मान्यवरांच्या सदिच्छापर मराठी गझलांचा संग्रह

**मराठी गझल समिधा**

कोरोनाविरुद्ध मराठी गझलकारांचेही योगदान

**संपादक – प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी,**
(सचिव, सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान)
संपादकीय मंडळ – प्रा. मनोहर कबाडे,
(कार्यकारिणी सदस्य, सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान.)
श्री. पुरुषोत्तम भांगे,
(सहसचिव, सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान)
श्री. अजय पांडे
श्री. संजय अयाचित
(निमंत्रित सदस्य, संपादकीय मंडळ)

या ई-अंकाची निर्मिती सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली.

हा अंक केवळ ई अंक असून तो फक्त सहभागी स्नेही प्रतिनिधींसाठी इलेक्ट्रोनिक माध्यमावर वितरीत करण्यासाठी आहे. या अंकातील कुठल्याही विचारांशी संपादक व सुधाकरराव कुलकर्णी प्रतिष्ठान सहमत असेलच, असे नाही. त्यामुळे याबद्दल संबंधित व्यक्ती त्याला सर्वथा जबाबदार असतील.



## प्रथम क्रमांकाची गझल



कधीचा तो तुझ्या मागे, इथे तर  मी झुरत होते
गजल तू घे जवळ त्याला, तुझी मी चल सवत होते.

पहाटेलाच ती गाते, उरामधल्या उमाळयांना
तिच्या त्या ऐकण्या ओव्या, कधीची मी दळत होते

नको तू थांबुनी आता, तुझी ही लेखणी मोडू
गुलाबी कागदांची मी, तुझ्यासाठी चळत होते

समजला तू  उगा शर्यत, मला सोबत हवी होती
कधी स्पर्धा न केली मी, जरी मी ही पळत होते.

किती हळवे हृदय झाले, पित्याला पाहुनी जर्जर
जुना अल्बम बघितल्यावर,  अनावर मी रडत होते

कितीही गाडले खाली, तरी अंकुर फुटत होते
धुमारे कोणत्या ओल्या, स्मृतींचे ते जळत होते

व्यथे थांबव अनाठायी, तुझे माझ्या घरी येणे
विसरले मी कधी काळी, मला हसणे जमत होते






सौ. निशा जगदीश चौसाळकर –

'गीताश्रम', परळी रोड, अंबाजोगाई जिल्हा : बीड
भ्रमणध्वनी ७७९८० ९५७११


काव्यसंग्रह - 'निनाद' (२०१४) म.सा.प. शाखा अंबाजोगाई ,
डॉ. शैला लोहिया लेखिका पुरस्कार. (२०१८)
कथा,कविता,गझल, बालगीते, बाल नाटुकले इ.लेखन.



## द्वितीय क्रमांकाची गझल



ताठून गेल्यावर कुणाचे प्रेत कवटाळू नका
निर्जीव देहाचे तुम्ही अवशेष सांभाळू नका

अंधार शोषून फक्त त्यांनी  पोसली आहे पिढी
जाज्वल्य किरणांचा उगम रात्रीत धुंडाळू नका

काढेल जग निष्कर्ष तुमच्या क्लिष्ट मार्गांचा उगा
नाजूक टाचांनो कधी तळव्यात भेगाळू नका

ठेवा अबाधित थर धुक्याचे उष्ण कटिबंधामधे
धग लागण्याआधी भितीने थेट वाफाळू नका

पोचाल नक्की शेवटी थांबायचे आहे तिथे
मागे प्रभूच्या जायला इतक्यात कंटाळू नका

भेटायला आहात आला तर सरळ हृदयात या
दारामधे येऊन पण पडवीत रेंगाळू  नका

प्राणास मुकल्यावर खरी वाहू तिला श्रध्दांजली
चैतन्य आहे आत तोवर स्तब्धता पाळू नका






डॉ .स्नेहल विनय कुलकर्णी - गारगोटी
(भ्रमणध्वनी९९२२५ ९९११७
गारगोटी ग्रामीण रुग्णालय येथे वैद्यकीय अधिकारी.


**गझलसंग्रह** – 'स्नेहांकित'. (चार राज्यस्तरीय पुरस्कार)

अनेक वृत्तपत्रातून  कविता , लेख , कथा, गझल प्रकाशित.



## तृतीय क्रमांकाची गझल



देहामधली, रक्तामधली थरथर वाढत जाते
तिला पाहिले की श्वासांची घरघर वाढत जाते

या ओठांनी त्या ओठांना थोडी द्यावी...घ्यावी
नाहीतर मग रक्तामधली साखर वाढत जाते

असा अबोला धरल्याने दुनियेचे बिघडत नाही
बस् दोघांच्यामधले थोडे अंतर वाढत जाते

नजर गुलाबी मुसमुसलेली असेल जर दोघांची
वयाबरोबर प्रेमामधले अत्तर वाढत जाते

वेल जशी त्या म्हाताऱ्या खोडावर वाढत जाते
लेक लाडकी बापाच्या खांद्यावर वाढत जाते

दिवा विझवल्या नंतर छळतो प्रश्न तिच्या स्पर्शाचा
वाढत जाते रात्र तसे मग उत्तर वाढत जाते



जमेल तेव्हा मिठीत घ्या..द्या ओलावा प्रेमाला
प्रेम बघा मग कसे भराभर भरभर वाढत जाते



**महेश बाळासाहेब मोरे (स्वच्छंदी)** - मु.पो.निमसोड, ता. खटाव,
जि.सातारा- ४१५५३८ मो.क्र. ८५५४० ८५१०१
स्पर्धा, संमेलनांतून गझल सादरीकरण. इंद्रधनू गझल कार्यशाळा व गझलस्पर्धांचे आयोजन. दरवर्षी ‘इंद्रधनू’ गझल दीपावली ई-विशेषांकाचे संपादन व फेसबुकपेजद्वारे नवोदितांचे शेर व गझल रसिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न.



## विशेष गुणवत्तापर गझल



गोंदलेली लाख दुःखे,वेदनांनी काळजावर
नोंद त्याची ही असावी,भंगलेल्या आरशावर

बघ स्वयंभू चाललेला,तारकांचा काफला हा
व्यक्त जो तो होत आहे, कालच्या त्या वारशावर

खूप झाली वर्णने ही,लाजणा-या चेह-याची
एक साधा शेर व्हावा,पापण्यांच्या पावसावर

हे शहर आता तुझ्या त्या जाणिवांनी व्यापलेले
भिस्त आहे सांत्वनाची, वाहणा-या आसवावर

वेड होते लागलेले, चंद्र, तारे, चांदण्याचे
रोज आता जीव जळतो, गांजलेल्या माणसावर

फक्त जोडा जोड नाही, फेक केली काफियांची
सूर्य आहे आणला मी, खेचुनी या कागदावर

जन्म म्हणजे सोसण्याची, जीवघेणी कार्यशाळा
ज्ञात झाले संजयाला, पेटतांना लाकडावर





**प्रा.संजयकुमार बामणीकर** -
रंगांजली,शिवदत्त हौसिंग सोसायटीजवळ,
छ.शिवाजीनगर,तरोडा(खु.) नांदेड - ४३१६०५
एम.एफ.ए.डीप.ए.एड्, २०००पासून गझलचा अभ्यास व लेखन,काफला या प्रातिनिधिक संग्रहातून प्रेरणा.गझलनवाज भीमराव पांचाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ४५गझलांचे लेखन.अ.भा.मराठी गझल संमेलन व मुशाय-यातून सहभाग. प्रातिनिधिक संग्रहांमधून गझलांचा सहभाग...

**मराठी गझल समिधा - २०२० 'गझलमाला', सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान**



## विशेष गुणवत्तापर गझल



भावनांना धार आली.. लेखणी तलवार झाली
शब्द आता सूर्य झाले अक्षरे अंगार झाली !

तापलेल्या काळजाला निश्चयाचा जोर आला
शोषितांनी सोसलेली वेदना एल्गार झाली !

काय सांगावी कुणाला बेगडी नीती जगाची
'मी' पणाचा आव नुसता, माणसे लाचार झाली

कोण आले? कोण गेले?, भास नुसते वेढणारे...
चार भिंती, एक खोली, शेवटी आधार झाली

झाकल्या डोळयात आता चेहरा दिसतो कुणाचा?
अंतरंगी का तुझी ती आकृती साकार झाली?

कोंडलेल्या भावनांनी केवढा कल्लोळ केला..
शेवटी ही लेखणीही लाजुनी बेजार झाली !





**व्यंकटेश कुलकर्णी** - ब्लॉक २,१३०६, एसएमआर विनय फाउंटनहेड, कलावरी मंदिराजवळ (चर्च), मियापूर मेट्रो स्टेशन जवळ, हैदर नगर, हैदराबाद ५०० ०४९.
भारतीय बहुराष्ट्रीय कंपनीत‘मार्केटिंग हेड’. कृषी पदवीधर. विविध लेखनासह मराठी आणि हिंदी, उर्दू गझल अभ्यास व लेखन. हैदराबादेत ‘मराठी साहित्य कट्टा’ हा उपक्रम.



## विशेष गुणवत्तापर गझल



इतका का अडखळतो रस्ता
तू नसली की छळतो रस्ता

काय अशी ही केली जादू
तू दिसतां घुटमळतो रस्ता

बघणाऱ्याला समजत नाही
जगणाऱ्याला कळतो रस्ता

अगदी सरळच घर माझे पण ,
तू वळते अन् वळतो रस्ता

त्याची माझी हीच अवस्था
आठवणीतच जळतो रस्ता

काय पुन्हा ती येत असावी ?
हाय पुन्हा दरवळतो रस्ता

मुक्कामाचे गाव नसावे
म्हणुनी का तळमळतो रस्ता

बसलेल्यांशी थांबत नाही
पळणाऱ्याचा पळतो रस्ता

आनंदात मिसळतो अपुल्या
दुःखाला हळहळतो रस्ता

गझल तुझी ही गुणगुणतांना
गतकाळास उजळतो रस्ता





**सचिन प्रकाश साताळकर**- मु. पो. एरंडगाव ता. येवला,
जि. नाशिक - ४२३४०१ भ्रमणध्वनी : ७५८८६१६१६३

जि. प. नाशिक अंतर्गत प्राथमिक शिक्षक. विविध दिवाळी अंक, नियतकालिके व वृत्तपत्रे यांतून वेळोवेळी गझल प्रसिद्ध.



## विशेष गुणवत्तापर गझल



थकवून आज गेली, दिवसास फार स्वप्ने
डोळ्यात राहिलेली, काही चुकार स्वप्ने

सोडून हात माझा, गेला उजाडताना
त्याच्याचमागुनी मग, झाली पसार स्वप्ने

प्रारब्ध रोज करते, सौदा तिच्या तनाचा
होतात भग्न राती, एकेक ठार स्वप्ने

गावाकडून लोंढे, शहरात माणसांचे
असतात सोबतीला, काही उधार स्वप्ने

जो तो निघून गेला, आपापल्या दिशेने
या एकटेपणाला देती नकार स्वप्ने



काचेत सजवलेली, बार्बी महाग होती
काचेपल्याड मुलगी अन् आरपार स्वप्ने



**सुनीति लिमये -** ८४३, सदाशिव पेठ , गुणगौरव सोसायटी,
पहिला मजला, खालकर तालमीजवळ, पुणे – ३०
योग शिक्षिका, एस. एन. डी./ टी. महाविद्यालयाचा संगीत
पदविका अभ्यासक्रम. **काव्यसंग्रह - 'स्वर थेंबाचे' व 'एकांतवेल'**
विविध नियतकालिकांतून, ई-अंकांतून कविता, गझल प्रसिद्ध



## विशेष गुणवत्तापर गझल



निळया नभावर बनून खग तू
जगायचे तर,खुशाल जग तू

विझून होते,शरीर राखच
तरी असू दे,जिवंत धग तू

जगावयाचे,असेल शिल्लक
चुकव यमाला,बनून ठग तू

टिकावयाचे ,असेल तर बन
कधी लव्हाळी,धरून तग तू

तळात जपला,अखंड पर्वत
असे हिमाचे ,वरील नग तू

दिसेल तुजला,भलेच जग हे
जवळ असू दे ,जरा उमग तू

सुकून गेली ,उभी जवानी
बरस धरेवर ,बनून ढग तू





**सुरेश नारायण तायडे** (प्रा.शिक्षक) मलकापूर जि.बुलडाणा

काव्यसंग्रह - 'भाकरी कवितेतली.' अनेक दिवाळी अंक, वर्तमानपत्रात लेखन. अनेक प्रातिनिधिक काव्यसंग्रहात लेखन. अनेक काव्यसंमेलनात सादरीकरण. ९३ व्या अ. भा. सा. संमेलनात काव्यवाचन



## उत्तेजनार्थ गझल



नजरेच्या मागील अधाशी नजर कुणाला कळते ?
कुठे आपली हलकट नीयत इतर कुणाला कळते ?

जन्म लावतो नादी, आपण किती वहावत जातो..
या जन्माच्या बाटलीतले जहर कुणाला कळते ?

मोहाची फुलबाग टाळुनी जेव्हा पाउल वळते
तेव्हा आपण सर केलेले शिखर कुणाला कळते ?

हृदयाच्या एका कप्प्यातच जी इच्छा गुदमरते
त्या इच्छेच्या अपमृत्यूची खबर कुणाला कळते ?

शहराला गावच्या हवेची आस लागली आहे
पण गावाच्या स्वप्नांमधले शहर कुणाला कळते ?

ज्याची अख्खी हयात अडली एका शब्दासाठी
अशा कवीच्या कवितेमधली जिगर कुणाला कळते ?





**अमितकुमार खातू** - फ्लॅट नं. २, नवकार अव्हेन्यू, उद्योग नगर,
चिंचवड, पुणे - ४११ ०३३.
कॉर्पोरेट विधी सल्लागार - २० वर्षे
काव्य लेखन, गझल लेखन - सुमारे १५ वर्षे.



## उत्तेजनार्थ गझल



गंध जर तुम्हास परिसरात पाहिजे
चांगला गुलाब अंगणात पाहिजे

फक्त वात पेटवून काय फायदा?
तेलही तुझ्या निरांजनात पाहिजे

ओळ पाहिजे तशी तुला सुचेलही
एक चंद्र आपल्या मनात पाहिजे

जा नि आण पाखरा झकास बातमी
-- ती मला दिल्या घरी सुखात पाहिजे

काव्य जे दिसेल, धोपटून काढणे
हाच गुण खऱ्या समीक्षकात पाहिजे ! !





**केदार पाटणकर** - ता.खेड, जि.रत्नागिरी - ४१५७२२
ग्रंथालय अधिकारी (Information Resource Center Manager)
घरडा केमिकल्स लि., एम.आय.डी.सी.,लोटे.
ललित व लघुकथांची आवड, योगासने, बुध्दिबळ खेळण्याची आवड, चित्रपटसमीक्षा व साहित्यसमीक्षा वाचनाची आवड.





## उत्तेजनार्थ गझल

न नोकरीत चांगला कुणीच शब्द बोलला
अखेरच्या दिनी किती स्तुतीस पात्र जाहला..

हसून लोळवी किती जनांस तो सहजपणे
व्यथा मनात दडवुनी खुषीत तोच दंगला..

समोर ती न भेटली कधी न बोललो तिला
मनी जपून ठेवली छबीत जीव गुंतला..

कटीस हात लावुनी निवांत तो उभा पहा
मनात प्रश्न नेहमी कधी कुणास पावला..

कुणी जिवास त्या कधी न एक फूलही दिले
कितीक हार शेवटी कसा सजून चालला..





**विजयकुमार देशपांडे** - सोलापूर मिल हौ. सोसायटी, फ्लॅट नं. ए ३, सुपर मार्केटजवळ, ९१ मुरारजी पेठ, सोलापूर.. ४१३००१ **बी.एस्सी. निवृत्त अधिकारी- स्टेट बँक ऑफ इंडिया.** हायकू, चारोळ्या, कविता, वात्रटिका, भक्तीगीते, बालसाहित्य, विडंबने, विनोदी किस्से, लघुकथा, ललित निबंध, एकांकिका इ. साहित्य विविध नियतकालिकात प्रकाशित. 'मराठबोली समूहा'च्या (पुणे) 'लोकसाहित्यिक' पुरस्काराने सन्मानित. इंटरनेटवर 'माझा लेखन प्रपंच' ब्लॉग. **बालकवितासंग्रह** - 'चांदोबाचा दिवा' [दुसरी आवृत्ती]. **चारोळीसंग्रह** - 'सखे तुझ्यासाठी' [दुसरी आवृत्ती]



## उत्तेजनार्थ गझल



आयुष्याचे प्रचंड गलबत आणिक त्यावर स्वार किती
किती अडकले जन्मामध्ये अन मृत्यूच्या पार किती

पाठ कुणाला दिसली नाही खंजीराने सजलेली
वरवर पाहत दुनिया म्हणते गळयात याच्या हार किती?

माझी चाहुल एकदातरी लागू दे ना जरा तुला
कधीतरी तू स्वतःहून ये, मी ठोठावू दार किती


कळी वाहते डोक्यावरती रोज अपेक्षांचे ओझे
फांदी टाके रानफुलाच्या पाठीवरती भार किती

तुझ्या हातच्या पाण्यानेही धुंदी येते मला प्रिये
तुझ्याचसाठी रस्त्यामधले टाळत आलो बार किती!

हातामध्ये कॅल्सी घेउन समोर माझ्या बसा तुम्ही
मोजुन जखमा गणित करूया, वार किती अन यार किती



'शऊर' सध्या भल्याभल्याना भुलवत आहे तुझी कथा
मालमसाला किती यामधे , ओतलेस तू सार किती?



**चैतन्य कुलकर्णी 'शऊर' -** A8, रिव्हेरा अपार्टमेंट, सिताई नगर, धायरी, पुणे – ४११०४० मूळ गाव खेड, रत्नागिरी B.E. (Mechanical). २०१८ पासून मराठी व उर्दू गझलेस सुरुवात. सुरेश भट यांच्या 'एल्गार' व 'झंझावात'पासून प्रेरणा.



## उत्तेजनार्थ गझल



पापण्यांवर आसवांचे भार झाले
दुःख माझे आपसूकच ठार झाले

शेवटी मज थांबणे जमलेच नाही
सज्जनांचे रक्त जेथे गार  झाले

माळले केसात तू जे फूल साधे
त्या फुलांचे बघ सुगंधी हार झाले


राहण्या गावात आली काल दंगल
शांततेवर लाखदा मग वार झाले


भेटली जेव्हा नदी ही सागराला
सागराचे दुःख खारेशार झाले






**विनोद गहाणे,गोंदिया -** शिक्षक, जि. प.व.प्राथ.शाळा
कनेरी/राम, पं.स.सडक / अर्जुनी जि. गोंदिया
































# मराठी गझल समिधा – स्पर्धा २०२० चे मानकरी

काचेत सजवलेली बार्बी महाग होती
काचेपल्याड मुलगी अन् आरपार स्वप्ने

... व्वाह् क्या बात है ..!

सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या ‘गजलमाला’चे प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी यांनी आयोजित केलेल्या गजलस्पर्धेत असे अनेक सुंदर सुंदर शेर आणि गजला भेटल्या. आयोजकांचे खूप खूप धन्यवाद !

या स्पर्धेत एकूण ३० गजलकारांनी सहभाग नोंदवला आणि या गजलांचे परीक्षण करण्याचं भाग्य मला लाभलं, हा मी माझा बहुमान समजतो. हा एक शेर पहा –

नको तू थांबुनी आता तुझी ही लेखणी मोडू
गुलाबी कागदाची मी तुझ्यासाठी चळत होते

गजल लिहिणाऱ्या या नव्या पिढीचं खूप कौतुक आणि अभिनंदन !

हे गजलकार आपल्या मनातील आशय अपरिहार्यपणे, तसेच अगदी सहजपणे गजलेत व्यक्त करताना दिसतात. त्यांच्या गजलेतून भावगीतात्मक वृत्ती प्रकट होताना दिसते. आशयाने सहजपणे घेतलेला स्वाभाविक आविष्कार वाटतो. या सर्वांची गजल वरवर सोपी, गेय आणि वाचनीय असून तिचे सर्व पैलू सर्वार्थानं आकळतात. त्यांचे संवेदनशील मन, जीवनोत्सुक वृत्ती, त्यांच्या ठिकाणी असणारी मानवतावादी सहभावना यांचेच आविष्करण त्यांच्या गजलेतून होताना दिसते. या सर्वच गजलांवर व्यक्तिवादी आणि आशावादी प्रवृत्तीचे संस्कार जाणवतात. त्यांची प्रतिभा नव्याचा शोध घेणारी आहे. या गजलांमधून संस्कृतीचिंतन आणि मानवतेचे दर्शन घडते. त्यांच्या विचारांना भावनांचे पंख जोडलेले आहेत. त्यामुळे त्या सहजस्फूर्त आणि जाणिवांना स्पर्श करतात. या रचनांमध्ये शाश्वताचा मृद्गंध भरलेला असून त्या व्यापक मानवता धर्माकडे घेवून जातात. त्यांच्या ठिकाणी असलेल्या सामाजिक बांधिलकीची प्रचीती येते.

हा एक शेर पहा –

काय पुन्हा ती येत असावी .. !
हाय, पुन्हा दरवळला रस्ता

.... या गजलांमधली अचूक शब्दनिवड मनाला भावून जाते. काही गजलांमध्ये भावकोवळीकता, काहींमध्ये प्रौढता, तर काहींमध्ये विचारांची परिपक्वता दिसते. या सर्वच गजलनिर्मितीला त्यांची भावस्पर्शी तरल प्रतिभा कारणीभूत आहे.

गजलचा स्थायीभाव आहे, प्रेम. गजल म्हणजे प्रियकर-प्रेयसीची कुजबूज. गजलेची व्याख्याच करायची तर अशी करता येईल –

गजल म्हणजे कुण्या रूपवतीचे लयबद्ध पदन्यास
गजल म्हणजे जखमी कळया-फुलांचा हव्यास
गजल म्हणजे आकाशीच्या विद्युल्लतेचा ध्यास
गजल म्हणजे कवीकुलगुरू कालिदास, वाल्मिकी, व्यास

गजल असते तुम्हाला हाकारणारी.., मनाला साद घालणारी.., मातीशी नातं सांगणारी.., मस्तीत धुंद होणारी.., निसर्गात विहरणारी.., जीवनवेलीवर झुलणारी.., पानापानातून निथळणारी.., घामाचं अत्तर करणारी.., आसवांची सोबत करणारी.., काळजात रुजून ओठांवर सजणारी.., जगायला बळ देणारी.., हवीहवीशी वाटणारी.., अल्लड पावसासारखी.., अलगद उतरून मन प्रफुल्लित करणारी.., श्रावणसरीसारखी नकळत येवून चिंब करणारी.., भारतीय संस्कृतीचे सारे शुभशकून सांगणारी.

गजल लिहिताना नेहमी लक्षात ठेवायची गोष्ट म्हणजे – आपण सकारात्मकच लिहायला हवे. घेतलेलं वृत्त कसोशीने पाळायला हवे. गजलेचा एक नियम आहे, की संपूर्ण गजल एकाच वृत्तात असायला हवी. त्यासाठी अक्षरगणवृत्त वापरायला हवे. गजल मात्रावृत्तात शक्यतो असू नये. तसेच, ५ / ७ शेर खूप झाले. ती फार लांब असू नये. काफिया शक्यतो शुद्ध असावा. त्यात तडजोड करू नये. गजलेचा शेर ‘हार्श’ नसावा. तो कुणाला ‘हर्ट’ करणारा नसावा. गजलेची भाषा नेहमीच भद्र असावी. प्रासादिक असावी. तिचे शेर आशावादी असावेत. त्यासाठी गजलकाराने कधीही शब्दांच्या प्रेमात पडू नये, तर शब्दांनी त्यांच्या प्रेमात पडलं पाहिजे. अवास्तव काहीही लिहू नये. वास्तव तेवढंच लिहावं. चांगल्या गजलेतही एखादा शेर अभद्र शब्दांचा असेल, तर गजलेची उंची कमी करतो.

हा शेर पहा –

ओळ पाहिजे तशी तुला सुचेलही
एक चंद्र आपल्या मनात पाहिजे

कवीच्या मनात सतत कृष्णाची बासरी वाजत असली पाहिजे. सर्वांनी कृतज्ञ असलं पाहिजे. तुमची गजल आणखी सुंदर होईल.

गजल लिहिणे ही काही साधी विधा नाही. त्यामागे तुमचा अभ्यास, तुमची तपश्चर्या असते. कवी आपलं काळीजच रसिकांच्या तळहातावर ठेवत असतो. गजल ही आनंदाची विधा आहे. तिनं स्वत:बरोबरच रसिकांनाही आनंद दिला पाहिजे.

त्यासाठी रसिकांची गजलेकडून मागणी असते, आम्हाला सुखी कर.., आम्हाला आनंदी कर.., आम्हाला भावोत्कट कर.., आम्हाला स्वप्न पाहू दे.., आम्हाला रडू दे.., आम्हाला हसू दे.., आम्हाला विचारप्रवृत्त कर .. ह्या मागण्या गजलेनं रसिकाला पुरवायला हव्यात.

साहित्य हे पिढ्यानपिढ्यांची संस्कृती घेवून येत असतं. ते चिरंजीव असतं. चिरंतन असतं. गजल तर एक लावण्यवती आहे. तिच्याशी बोलताना जपूनच शब्द वापरले पाहिजेत. नेहमीच ते अवधान ठेवलं पाहिजे.

नवीन पिढी खूप छान लिहीत आहे. तिच्याकडून खूप अपेक्षा आहेत. सर्वच गजला छान आहेत. पण त्या आणखी छान कशा होतील हे पाहिलं पाहिजे.

कवी गुलजारजींना एकदा एका मुलाखतीत विचारलं, की “सर, आपको तैरना आता है ?” त्यांनी उत्तर दिलं – “मुझको डूबना आता है...!”

आपणही लिहिताना खोलवर विचार करून लिहायला हवं.

तूर्त एवढंच.

सर्वांचं अभिनंदन आणि सर्वांच्याच गजललेखनास शुभेच्छा.

- अे. के. शेख

## स्पर्धा गझल

मी कारण नसतानाही, का सत्व परिक्षा द्यावी
का इतकी कठोर शिक्षा, मज अपराधाविण व्हावी

जी सुखे लाभली त्यांना, प्राक्तन काढूनच घेते
ह्या आनंदात कितीदा, आसवे सदा मिसळावी

वाटे धरते खपली पण, ती सलते वाढत जाते
जितके जखमेस जपावे, आतुन कोरत चिघळावी

का एका दुःखापायी, आसवे हजारो डोळा
वेदने व्यथेची घुसमट, मी मुकाट साहत जावी

सुकलेल्या म्लान फुलांचे, दिन सरती ऋतू बदलता
का पानगळीची चिंता, काळजा उगा कोरावी

का अंधाऱ्या रातीचे, भय मला तमाचे वाटे
आशेची शाश्वत दिवली, नेमकी तिथे उजळावी

त्या अवखळ लाटांनाही, हक्काचा असे किनारा
वादळ वाऱ्याची धास्ती, मी आता कशास घ्यावी

मी जन्म मृत्यूचा विणते, अविरत हा गोफ दुहेरी
यत्नांची अगणित द्वारे, मग नियतीने उघडावी

कवितेशी आहे माझे, द्वैतापलिकडले नाते
भावार्थी चिंब भिजावी, ती नित्य नवी भासावी



अलका कुलकर्णी - 'अथर्व' किशोर नगर, राणेनगर, नाशिक ४२२००९ मोबा:९८५०२५३३५१

२ कविता संग्रह,२ कादंबरी (अनुवाद), १ कथासंग्रह, १ ललित संग्रह, १ चरित्र लेखन पुरस्कार : गीत रत्न, इंद्रायणी, कवी गोविंद, अ. वा. वर्टी, रणरागिणी असे राज्यस्तरीय १६ पुरस्कार. इतर ललित, कथा, निबंध, कवितालेखनाचे पुरस्कार
विशेष: साहित्य सखी संस्था नाशिक (सचिव)

## स्पर्धा गझल

गरजांनी मला गर्दीत चालाया शिकवले
श्वासांनी घडीभर शांत थांबाया शिकवले

मी होतो तिथेच अजूनही आहे अडकुनी
तो बांधून परतेना न सोडाया शिकवले

एकांतात दिवस असे सुसाट निघून गेले
होता भेट मृत्यूशी न टाळाया शिकवले

शब्दांचे तु जे समजावले ते अर्थ भुललो
वापस येत ही नाही, न तु स्मराया शिकवले

काही कर्ज बाकी मागच्या जन्मी असावे
तु उगा काय इतके व्याज फेडाया शिकवले

दिसती लक्षणे ती फक्त ओळखता सख्यांनो
कोणी अंतरी माझ्या न डोकाया शिकवले?

हे रस्ते सुने पाहून वाटे की हृदय मज
टाळेबंद का तेव्हाच न कराया शिकवले



**एकनाथ धनके,** जिल्हा बुलडाणा, तालुका जळगाव जामोद.
वास्तव्य - पुणे. शिक्षण - B.E. (Computer)
महानगरपालिकेत senior software engineer.

## स्पर्धा गझल

हो, भले राहू ढिले निष्ठेत आम्ही
पण सुरक्षित आमच्या कक्षेत आम्ही_

आग विझवा एकदा पोटातली ह्या
जन्मभर राहू पुन्हा कैदेत आम्ही _

गर्व दिसतो चेहऱ्यावर स्पष्ट अमुच्या
राहतो जेव्हा उभे सेवेत आम्ही_

मनगटातच जोर नसला, आपल्या की,
अडकतो मग हातच्या रेषेत आम्ही_

डगमगाया लागले हे मन कधी तर
आखतो मग कागदावर बेत आम्ही_



**सौ. किर्ती ज्ञानेश्वर टेकाळे (अरु तनया)** - तुळजाई अग्रो एजन्सीज, नवा मोंढा, परभणी – ४३१ ४०१
भ्रमणध्वनी – ९९२३१ ५३००० बी.ए. गृहिणी. लिखाणाची आणि वाचनाची आवड. अनेक कविसंमेलने व मुशायऱ्यांत सहभाग. स्वयंभू शैलीतील कवितेची एकलवाट भासणारी मनस्वी कविता.

## स्पर्धा गझल

अपुल्या दोघांमध्ये बघ इतकीच तफावत आहे
तू सहनशील वृत्तीचा माझ्यात कुरापत आहे!

स्पर्धा जगण्याची माझ्या रक्तात अशी भिनली की
प्रत्येक वाट मजला मी वाटेस पुकारत आहे!

मशहूर जाहलो की मी बदनाम जगी समजेना?
जो तो का माझा पत्ता रस्त्यास विचारत आहे?

पाखराप्रमाणे होता भुतकाळ गुलाबी माझा
हृदयास माझिया सुद्धा नाजूक दुखापत आहे!

त्याच्यासमान कोठेही चित्रकार दुसरा नाही
दमदार निसर्गावाणी कोणात करामत आहे?

नेमकी उसवली कोठे या आयुष्याची झोळी?
मी कमावतो तितके का दररोज गमावत आहे?

तोडल्या नकोशा साऱ्या शृंखला भिमाने म्हणुनी
या निळया नभाच्याखाली माणूस सलामत आहे!

कोणीच काल नव्हते पण मी होतो पाण्याखाली
दिसतो दुनियेस जरीही मी आज जिरायत आहे!

हा तुरुंग फोडाया ना उरला कोणीही वाली
सुटका माझी करण्याला माझीच जमानत आहे!

क्षुल्लक कोणा एकाच्या कोसळेल का द्वेषाने?
संविधान इतकी पक्की मजबूत इमारत आहे!

मज भुरळ कुणाची पडली ठाऊक मलाही नाही
मी दिले तरी कोणाला काळीज अनामत आहे?

श्वासांनी आढेवेढे घेतले किती आधी पण
दुःखांनाही आताशा आयुष्य सरावत आहे!

मुक्काम नेमका माझा ठाऊक मला नाही पण
जन्मलो तसे मजला हे आभाळ खुणावत आहे!

गझलेच्या मी ती माझ्या प्रेमात असे पडलो की
हृदयात काफिया माझ्या श्वासात अलामत आहे!




**चंद्रकांत कदम (सन्मित्र)** - कमल निवास,महात्मा फुले नगर, सरकारी ग्रामीण रुग्णालयाजवळ, भोकर. ता.भोकर जि.नांदेड – ४३१८०५ भ्रमणध्वनी ९९२१७ ८८९६१


जि.प.शिक्षक (जि.प.हायस्कूल जवळगाव ता.हिमायतनगर जि.नांदेड) गझल,कविता लेखन,गायनाची आवड. राज्यस्तरीय स्पर्धांमधून काव्यलेखन पुरस्कार.'समतेच्या डोहाकाठी' हा गझलसंग्रह भीमराव पांचाळेंच्या हस्ते प्रकाशित.

## स्पर्धा गझल

वणव्याला अर्पण केलेली वनराणीची बाग बघू
नंतर धरणीच्या डोळयांतिल धगधगणारी आग बघू

तुमच्याकडचा प्रलय पाहिला आता अमुचा भाग बघु
महापुराच्या डोळयांनी चल दुष्काळाचा नाग बघू

चंद्रालाही ग्रहण लागते सुखदुःखाचे कधीकधी
चंद्र समजण्यासाठी आधी चंद्रावरचे डाग बघू

कृष्ण राम अथवा बुद्धाच्या मार्गास लागण्यापूर्वी
राधा-मीरा,सीतेचा अन् यशोधरेचा त्याग बघू

जगावेगळे स्वप्न तुझे जर जगावेगळे यत्न हवे
अनवट वाटा अन् वळणांनी काढ यशाचा माग बघू

शुद्धीवर असताना सुद्धा पेंगत असतो दिवस तुझा
दोन पेग लावून नव्याने तुज येते का जाग बघू

रसिकत्वाची नजर पाहिजे व्यथा साजिऱ्या दिसण्याला
कवितेच्या खांद्यावर बसूनि दुनियेचा वैताग बघू

अठ्ठावीस युगांचा आहे लळा कालचा नाही हा
दिसेल पंढरपूर तुलाही तू चालाया लाग बघू



**चैतन्य श्रीकांत जोशी** – 'ब्रह्म चैतन्य' निवास, मोती नगर, कन्हेरी रोड, सुरवसे किराणा स्टोअर्स समोर, लातूर. ता. जि. लातूर. ४१३५१२

Electronics and Telecom अभियंता आहे.

अनेक वर्षांपासून कविता, गझल लेखन करतोय. वृत्तबद्ध कविता आणि गझलांची विशेष आवड आहे.

## स्पर्धा गझल

आता तरी कुठे हा हातात हात आहे
खोटेच फक्त दावे खोटीच बात आहे

नेले पळवून कोणी टाळूवरील लोणी
माझ्या सभोवताली ही कुठली जमात आहे

ठेवून दार उघडे आहे जरी मनाचे
गाफील सर्व स्वप्ने, गाफील रात आहे

भिंतीस कान होते ऐकू तरी न आले
कित्येक गारद्यांचा वासा घरात आहे

आता कुठे जरा मी बोलावयास आलो
पेटून आग झाली गाथा उरांत आहे

केला अजून मीही दावा कुठे कशाचा ... ?
गाते पुराण माझे माझीच जात आहे

ही वाहवा मिळाली तुमच्या सुरांतुनीही
ते गीत वेदनेचे काळीज गात आहे



**डॉ. प्रवीण बनकर** - सहायक प्राध्यापक, पशुअनुवंशशास्त्र विभाग,
पदव्युत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला
(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)

## स्पर्धा गझल

बोचले विश्व की मी मला टाळतो
दोष देऊ कुणा मी मला जाळतो

सिद्ध मी व्ह्यावया आण का घ्यायची
प्राण गेले तरी शब्द मी पाळतो

वेदना खोलवर बोचती अंतरी
दु:खितांची व्यथा मीच मग ढाळतो

वाचुनी जाहली पुस्तके माणसे
गाठण्या सत्य मग मी मला चाळतो

ही नशीली अदा वेड लावी जिवा
याच जादूवरी नित्य मी भाळतो

सांजवेळी सखे धुंद होता दिशा
साथ प्रेमात दे पुष्प मी माळतो

तू तिथे एकला मी इथे एकली
भेट काव्यास दे का असा वाळतो



**काव्यपरी तृप्ती अशोक काळे -** द्वारा राजू गव्हाणे, प्लॉट नं ७३, गजानन कॉलोनी, गारखेडा परिसर, औरंगाबाद ४३१००१ बी.ए. बी.एड., बि.लीब., एल.एल.बी., एल.एल.एम., डिप्लोमा इन जर्नालिझम. काव्यसंग्रह 'ओठांवरची गाणी', शिक्षिका, आकाशवाणी निवेदिका, उच्च न्यायालय औरंगाबाद येथे अनुवादक.

## स्पर्धा गझल

मोहात गुंतवावे आयुष्यभर कशाला ?
अन् नेहमी फसावे आयुष्यभर कशाला ?

अस्तित्व आसवांचे असते किती क्षणांचे
लागे तरी रडावे आयुष्यभर कशाला?

सूर्यास संगतीला घेऊन काळ पळतो
आम्ही इथे दमावे आयुष्यभर कशाला?

छद्मीपणे हसावे माझ्यावरी रुसावे
कळते तुला म्हणावे आयुष्यभर कशाला

मांडे मनातले मी सारे मनात ठेवी
इच्छांत मी दबावे आयुष्यभर कशाला?

वाटेत पत्थराचे साम्राज्य  भोवताली
कोणास सावरावे आयुष्यभर कशाला?

आहे हुशार ऐसा दावा कशास करतो
पेचात तू पडावे आयुष्यभर कशाला?



**प्रकाश रामचंद्र क्षीरसागर - ॲनेस्टिना** को-ऑप. हौसिंग सोसायटी, बी एस – २, थोरले भाट ताळगाव, पो. करंझाळे, उत्तर गोवा, ४०३ ००२
भ्र. ध्व. ९०११०८२२९९ बी.कॉम, एम. जे. पत्रकार व साहित्यिक.
**कविता संग्रह** -'गर्भावल्या संध्याकाळी', 'माती, पाऊस आणि सखी' इ. **गझलसंग्रह** - 'झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता' **कथा संग्रह** – 'अजि म्या कृषक पाहिला'. 'माणसांची खैर नाही' - ललितलेखसंग्रह कर्नाटक विद्यापीठ, धारवाड येथे अभ्यासक्रमात , अनेक साहित्य पुरस्कार

## स्पर्धा गझल

क्षण ऊनसावल्यांचे सरतील सांजवेळी
सारेच सारखे मग दिसतील सांजवेळी

तुलना उगाच होते वेगात धावण्याची
सारे थकून खाली बसतील सांजवेळी

मिळतील चालताना कित्येक सोबतीला
जे कोण आपले ते कळतील सांजवेळी

ओसाड पार हल्ली हे स्वप्न पाहतो की
एकत्र लोक येथे जमतील सांजवेळी

घडल्यात ज्या चुका अन् जे साधता न आले
बाबी लहानमोठ्या छळतील सांजवेळी

देवाकडे दिवसभर ज्यांनी न पाहिलेले
ते दीप देवपूजा करतील सांजवेळी



**भूषण कुलकर्णी -** मूळचा उदगीर (जि. लातूर). सध्या ओरॅकल, कॅलिफोर्निया इथे सॉफ्टवेअर इंजिनीअर. गझल, कवितेतून माझे विचार आणि अनुभव मांडण्याचा प्रयत्न करतो.

## स्पर्धा गझल

विहीर,तलाव ,डोह,सापळा झोळी उरली
हातामधेच इच्छेची मासोळी उरली..!

ती होती तर घरचे अंगण हसरे होते
ती गेल्यावर घरात मग आरोळी उरली.!

आई म्हणून भूक मारली जेंव्हा माझी
तेंव्हा तेंव्हा दुरडीमध्ये पोळी उरली.!

शहरामधला माणुस मोठा चतूर झाला
खेड्यामधली जनता साधीभोळी उरली.!

दिल्या घेतल्या आणाभाका मरण पावल्या
कशी एक त्या भिंतीवर चारोळी उरली.!

चिंचा पाडत बोरी वेचत नदी पोहणे
बालपणाची गोष्ट तशी आजोळी उरली.!

भाळी टिकली पायी पैंजण आणिक चिंता
इतकी बाईपणास काकणचोळी उरली.!



**मारोती पांडूरंग मानेमोड** - नरसी ता नायगाव जि. नांदेड
भ्रमणध्वनी ९४२०८ ६११३७

शिक्षक. मागील दहा वर्षापासून गझल लेखन. सामाजिक बांधिलकीची भावणारी गझल. विविध गझल मुशायरे व साहित्य संमेलनात सहभाग.

## स्पर्धा गझल

जे गुन्हे अक्षम्य झाले, त्या गुन्ह्यांची नोंद ठेवा
साक्ष देण्या, जे पुढे, आलेत त्यांची, नोंद ठेवा

घालताना घाव आली साद रडक्या पाखरांची
'छाटण्याआधी मुळांना सावल्यांची नोंद ठेवा'

शेवटी होईल कौतुक त्या गुलाबाच्या फुलाचे
मात्र अत्तर काढताना पाकळ्यांची नोंद ठेवा

न्यायदेवा तो नराधम सोडण्या निर्दोष आधी
न्यायआदेशात, साऱ्या, हुंदक्यांची नोंद ठेवा

वावराने, घात केला, भावकीचा, पण तरीही
जे खरे होते खुनी त्या दाखल्यांची नोंद ठेवा

तुच्छतेने, पाहताना, टोक वरचे, गाठल्यावर
ज्यामुळे ते गाठले त्या पायऱ्यांची नोंद ठेवा

मारल्या निष्पापितांचे, शोधण्या आधी पुरावे
पांढऱ्या भाळातल्या काळयामण्यांची नोंद ठेवा

पाहिजे जर गाजवाया,, राजसत्ता तर कधीही
दुष्मनी यादीत निवडक आपल्यांची नोंद ठेवा

राहिल्या शाबूत ज्या त्या, तारकांच्या शेवटाला
ज्या निखळल्या त्या बिचाऱ्या चांदण्यांची नोंद ठेवा




राहुल नंदकिशोर कुलकर्णी - राम नगर, देवपूर, धुळे
कर्मचारी : धुळे जिल्हा न्यायालय, धुळे.

## स्पर्धा गझल

आले कितीक शायर, मी वेगळाच आहे,
शब्दांत रक्त माझे, मी सांडणार आहे

वाहून पालख्या त्या, झुकली किती शरीरे,
पण ताठ या कण्याने मी चालणार आहे

गर्दीत शोधतो मी, दर्दी खऱ्या स्वरांचे,
सत्कार, हार दिसता झालो फरार आहे

गाती कुणी पवाडे, उसन्याच शौर्यगाथा
या लेखणीत माझ्या सलता विखार आहे

हा डाव जीवनाचा, हरतो पुन्हा नव्याने
शत्रूतही दिसे तो माझाच यार आहे

विझले जरी निखारे, राखेत ऊब अजुनी
नि:शब्द शांततेशी माझा करार आहे

तक्रार ना कुणाची करणार आज येथे
जखमेस मात्र ताज्या मी खोलणार आहे



**विकास साटम -** ७, शिवकृपा, हनुमान क्रॉस रोड, २, विले पार्ले (पू.)
मुंबई – ४०० ०५७ भ्रमणध्वनी - 9821510502
बांधकाम व्यवसाय.

## स्पर्धा गझल

पाहता,पाहता, माजती माणसे
शौर्य नाही तरी गाजती माणसे

' चेहरे ' लावुनी सर्व काही सुरू!
चेहरे दावण्या लाजती माणसे

पूर्ण विश्वात ह्या जोड आम्हा नसे!
मानुनीया असे, साजती माणसे

जिंकण्याला कसे व्हायचे ठाव ना!
हारता, हारता भाजती माणसे

ऐकण्याला कुणीका,नसे सोयिचे!
ऐकतो, मानुनी,वाजती माणसे



चालत्या पावला थांब रे! तू जरा!
वीष पाण्यातुनी पाजती माणसे

सर्व संपेल पण, शील जाईल ना!
औषधाला नसे, आज ती माणसे

विनय मिरासे ' अशांत' - ३०/१२, 'प्रयास', प्रेरणा नगर, यवतमाळ
१४ पुस्तके प्रकाशित. अनेक प्रतिष्ठित पुरस्काराचे मानकरी.

## इंद्रधनुच्या तोरणावली

अहंपणाचा कोष त्यागला घडू लागली
फुले उमलली तशी पाखरे इथे नाचली

तो जो झाला थेंब जलाचा परोपकारी
त्याच्यासाठी इंद्रधनूच्या तोरणावली

प्रेम दुश्मनी करा खुशीने पण टोकाची
अधली मधली इथे माणसे कुठे गाजली

अशी वासना दलदल झाली माझ्यामधली
किती संपली अगणित नाती किती लाजली

वाचत नाही फक्त पुस्तके तसा यार हो
बंद लिफाफे तशी  माणसे खूप वाचली



**विष्णु जोंधळे** - ३०/स्नेहबंध, संभाजीनगर, शहादा जिल्हा- नंदुरबार (४२५४०९) भ्रमणध्वनी ९५५२१०७१२५ / ९४२३१९४६३३
माध्यमिक शिक्षक, व्यावसायिक सूत्रसंचालक, पत्रकार.
जिल्हाध्यक्ष - कास्ट्राईब शिक्षक संघटना, अध्यक्ष-:प्रेस क्लब, शहादा
कार्याध्यक्ष - अंकूर साहित्य संघ, जिल्हाध्यक्ष-:गझल मंथन नंदुरबार.
संचालक-: नंदुरबार जिल्हा पतसंस्था फेडरेशन, माध्य.पतसंस्था

## स्पर्धा गझल

करून कर्म चांगले सुधारलो कुठे भिडू
तटस्थ राहिलो तरी बचावलो कुठे भिडू

गुलाम होउनी तिचा हुकूम पाळला तरी
नकारलेच शेवटी... दुखावलो कुठे भिडू.

जुन्या व्रणातुनी अजून मुक्त व्हायचे मला
नवीन वार झेलण्या सरावलो कुठे भिडू

विचार एकदा तरी कुठेय सावली तुझी
अजून शोधतोस काय पोळलो कुठे भिडू

खरेच वाटते तुला? रुधीर तापते कुठे?
बनून आग तप्त मी झळाळलो कुठे भिडू

वरून शांत नीर मी, उगाच डुचमळू नको
तळात गाळ खूप पण गढूळलो कुठे भिडू

निमित्त फक्त सापडावयास पाहिजे जरा
अजून रुद्र होउनी, कडाडलो कुठे भिडू



संजय तिडके, अहमदपूर - मु.कुनकी, पो.पाटोदा (बु)
ता.जळकोट जि.लातूर शिक्षक : केंद्रीय प्राथमिक शाळा, राणी सावरगाव, ता. गंगाखेड जि. परभणी

## स्पर्धा गझल

युगयुगांचा त्रास हा गेला टिपेला वाटतो ..
विठ्ठलाचा भार आता या विटेला वाटतो ..

पाहिली अ◌ोलावताना मी चितेची पापणी ,
आज बहुदा सद्‌गुणी माणूस मेला वाटतो ...

लटकतो खोपा कुठे हिरवा कुठे भगवा ,निळा;
पाखरांनी आज जातीवाद केला वाटतो ...

वीज कडकडली मघाशी हुंदक्यागत वाटली ,
कंठ आभाळा तुझाही दाटलेला वाटतो ...

पोट गेलेले खपाटी अन् नजर व्याकूळली ,
जीवना तू जन्म जन्माचा भुकेला वाटतो ..

वावराचा बघ किती दिसतोय सुतकी चेहरा ,
पावसाचा काल बहुदा जीव गेला वाटतो ...



**सचिन हरी क्षीरसागर** - कळंब
शिक्षण- बारावी
व्यवसाय- पान स्टौल.
जीवनाच्या थेट अनुभूतीशी हितगुज करणारी, कैफियत मांडणारी गझल म्हणजे सचिन क्षीरसागर. गेल्या अनेक वर्षांपासून निर्व्याज, एकलव्याप्रमाणे गझल लेखन करणारा गझलकार.

## स्पर्धा गझल

मथळ्यामध्ये येणारी मी खबर वगैरे झालो नाही
मरतानाही नुसता मेलो अमर वगैरे झालो नाही

इथे द्रौपदी लुटली गेली पाहत बसलो  डोळ्यांनी या
तिची आबरू झाकायाला पदर वगैरे झालो नाही

तिच्या वेदना डोळ्यामधुनी दिसल्या असत्या खचित मला पण
ठाव मनीचा ओळखणारी नजर वगैरे झालो नाही

जसे घेतलेले सर्वांनी सोंग घेतले मी झोपेचे
सर्वांना जागे करणारा गजर वगैरे झालो नाही

जेथे कोणी फिरकत नाही तेथे बनले थडगे माझे
राजेशाही थाटाची पण कबर वगैरे झालो नाही

अमृत नाही होऊ शकलो कधीच मी कोणासाठीही
हेही वास्तव कोणासाठी जहर वगैरे झालो नाही



सिद्धेश्वर गुळवे, मु. पो. शेळगाव ता. परंडा,जि. उस्मानाबाद
४१३५०५
शिक्षक. अनेक नियतकालिके, समाज माध्यमे यांतून गझल गाजते आहे. सक्षम व सशक्त गझल.
'गझल मंथन'च्या गझल स्पर्धेत अनेक वेळा यश प्राप्त.

**नमस्कार !**

सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठानच्या **‘गझलमाला’** या उपक्रमांतर्गत मराठी गझलसम्राट आदरणीय सुरेश भट यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित **मराठी गझल स्पर्धेतील निवडक स्पर्धकांच्या आणि मान्यवरांच्या सदिच्छापर गझलांचे हे संकलन ई – अंकाच्या स्वरुपात प्रसिद्ध करत आहोत. सध्याचा काळ कोरोनाग्रस्त असल्यामुळे हा आनंदाचा, जल्लोषाचा क्षण जरी म्हणता येत नसला, तरी तो वैशिष्ट्यपूर्ण आहे हे नाकारता येणार नाही.**

दरवर्षी १५ एप्रिल रोजी मुशायऱ्याचे आयोजन केले जाते. यावर्षी कोरोनाच्या समस्येमुळे **मराठी गझल स्पर्धेचे आयोजन** करण्यात आले. सुरेश भट यांच्या मनीमानसी असणारे ‘विजा घेवून येणाऱ्या पिढ्यां’तील शेकडो कवी आज उत्तम गझल लिहीत आहेत.

सर्वांनी त्यास अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कुठलेही पारितोषिक नसताना आपण दिलेल्या प्रतिसादाबद्दल आपले विशेष आभार ! यावरून गझल लिहिण्याच्या प्रवासातले अवलोकन करण्याची आपली सर्वांची वृत्ती दिसून येते. त्याचे विशेष अप्रूप वाटते.

**या स्पर्धेत ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला व त्याहून अधिक सदिच्छापर गझलांची नोंद** झाली आहे. या स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेले शुल्क कोरोनाविरुद्ध सर्व स्तरांवरून चालू असलेल्या लढाईत योगदान देण्यासाठी वापरण्यात येणार होते. त्यामुळे अगदी विधायक दृष्टीकोनातून आणि आमच्याविषयी असलेल्या स्नेहापोटी काही मान्यवरांनी अधिकचे योगदान दिले. गझलचे रसिकाग्रणी आणि आदरणीय देवदत्त संगेप यांनी तर गझल नाही, तरी रु. ५००/- चे योगदान दिले. स्नेही मित्र दत्तप्रसाद जोग, गोविंद नाईक, विष्णू जोंधळे, चंद्रकांत कदम, प्रफुल्ल कुलकर्णी यांनीही अधिकचे योगदान दिले. आपणा सर्वांच्या एकूण निधीइतकेच योगदान प्रतिष्ठानतर्फे भर घालून ते रु. १००००/- (रुपये दहा हजार फक्त) पंतप्रधान निधीत (’पी एम केअर्स’) व रु. ५०००/- (रुपये पाच हजर फक्त) मुख्यमंत्री निधीत (‘सी. एम. केअर्स’) शासननिधीत प्रदान करण्यात आले. मराठी गझलकारांच्या योगदानाची ही नोंद सार्थ सन्मानाने घेतली जावी, ही अपेक्षा.

हे छोटेसे योगदान ही आमच्या समाधानाची आणि अभिमानाचीही बाब आहे. अनेकांना इच्छा असूनही केवळ काही तांत्रिक व अपरिहार्य कारणांनी सोबत येता आले नाही, तर काहींपर्यंत आम्ही पोचू शकलो नाहीत. तरी ते सोबतच आहेत, याची स्नेहपूर्वक जाणीव आहे. अनेक ज्येष्ठांनी यात आम्हाला पाठबळ दिले, आशीर्वाद दिले. तेही प्रेरकच ठरले.

वास्तविक पाहता, कोरोनाविरुद्धच्या लढ्यात प्रतिष्ठानचे योगदान होणार होतेच. सामाजिक बांधिलकीने कार्य करीत असताना, आम्ही त्यापासून वेगळे, निराळे राहू शकत नाही. प्रतिष्ठानच्या कार्याचा लेखाजोखा मांडण्याची ही जागा नाही. तरीही, थोडेसे स्वातंत्र्य घेवून व आपली क्षमा मागून एवढेच सांगणे आहे, की विशेषत: शैक्षणिक उपक्रमांत – त्यातही ग्रामीण भागातील शैक्षणिक क्षेत्रात विविध मार्गाने कार्य प्रतिष्ठान करीत आहे. अर्थातच ग्रामीण भागातले शिक्षण अनेक अनुषंगिक विषय घेवून येते, हे सांगायला नको. त्या सर्व क्षेत्रात आपल्या परीने आम्ही कार्य करीत आहोतच. विशिष्ट जाणिवेने आम्ही गझलही त्याला जोडली आहे. बाकी सविस्तर माहिती आपणा सर्वांना लवकरच अवतरणाऱ्या संकेतस्थळावर ही मिळेलच. पण आपले सर्वांचे योगदान आम्ही 'समिधा' म्हणूनच घेत असताना, केवळ आमच्या समिधांना बळकटी आणण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता. त्यामुळे आपले योगदान किती मोलाचे आहे, हे शब्दातीत आहे. पण शब्दाशिवाय आपल्याला माध्यम तरी एरवी कुठले असणार आहे ? म्हणून हे उल्लेख.

ज्या अतिशय सशक्त गझल लिहिणाऱ्या मान्यवर नव्या, जुन्या गझलकारांनी आपल्या गझलेचे तत्पर असे सशुल्क योगदान दिले, त्यांचे आम्ही अक्षरश: ऋणी आहोत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे, तर महाराष्ट्राबाहेरूनही अनेक स्नेही गझलकारांनी अतिशय बांधिलकीने साथ दिली.

वास्तविक पाहता, यातील गझलकारांची मातबरी पाहता, त्यांना स्पर्धेसारख्या इतक्या छोट्या उपक्रमासाठी आमंत्रित करणे योग्य नव्हते. एकेकाचा अल्प परिचयसुद्धा इतका मोठा आहे, की त्यांना अशा कामासाठी साद घालणेही संकोचाचे होते. पण स्नेहाचा विश्वास असल्यामुळे मी ते धाडस केले. या उपक्रमाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी त्यांनी दिलेले सदिच्छापर योगदान आणि सस्नेह सहकार्य अतिशय मोलाचे आहे. या अंकाची उंची सर्वांच्या गझलांनी वाढवली आहे, हे निश्चित. अनेक नव्या गझलकारांना त्याचा नक्कीच फायदा होईल.

आपणा सर्वांच्या माहितीसाठी सांगण्यास आनंद व समाधान होत आहे, की महाराष्ट्रातील गझलकारांच्या **एका पिढीचे मार्गदर्शक ज्येष्ठ गझलकार, अभ्यासक व अत्यंत मनमिळावू सेवाभावी वृत्तीचे आदरणीय श्री.** ए. के. शेख हे यांनी या स्पर्धेचे परीक्षण करण्याच्या आमच्या विनंतीस मान दिला, हे आमचे भाग्य आहे. आपले सर्वांचेही.

आपले सर्वांचे कोरोनाविरुद्धच्या लढाईतले हे योगदान महत्वाचे आहे.

सर्वात शेवटी, संयोजक म्हणून एक सांगणे आहे.

अगदी कानात मित्रगोष्ट सांगावी तशी ही गोष्ट मी तुम्हाला सांगत आहे. कलाकृतीच्या निर्मितीची स्पर्धा नसावीच, असे माझे वैयक्तिक मत. मुळात सापेक्षरूप असलेल्या कलेच्या, प्रतिभेच्या आविष्कारासाठी स्पर्धेचे क्षितिज अतिशय तोकडे असते. गझलेच्या बाबतीत तर ते अधिकच जाणवते. पण गझलेच्या बाबतीत तांत्रिकता हा एक मोठाच मुद्दा आहे. ज्याप्रमाणे या तांत्रिकतेच्या कितीतरी पलीकडे गझलेच्या सूक्ष्म अनुभूती अभिव्यक्तीचे अचाट आणि अथांग विश्व आहे, त्याप्रमाणे अभिव्यक्तीचे यश आणि महत्व स्पर्धेपलिकडचे आहे. तिथे स्पर्धा काय, पहिला-दुसरा क्रमांक काय – ज्येष्ठ – कनिष्ठता किंवा आपले लहान-मोठेपण काय... ! जीवनाच्या, अनुभूतीच्या विराट, जगड्व्याळ व्यापारापुढे आपले व्यक्त होणे ते काय... ! अर्थात, जे मोठे आहे, ज्येष्ठ व श्रेष्ठ आहेत त्यांचा मानसन्मान तर केलाच पाहिजे. **पण स्पर्धा ही क्षणिक असते. त्याचप्रमाणे ती, शिक्षणाचे माध्यमच असते.** परीक्षेचा कालावधी हा अध्ययनाचाच एक भाग असतो. त्यामुळे या स्पर्धेचे या जाणिवेतूनच आयोजन. एरवी, फक्त एकत्र येण्याचे माध्यम म्हणूनच हा स्पर्धेचा ‘व्यवहार’ आम्ही केला. त्यामागचे ईप्सित काही वेगळेच आहे. आपल्यात ‘तुलनाबाजार’ लावण्याचे नाहीच. आपला जीवनाकडे बघण्याचा परिप्रेक्ष्य सदैव शिकण्याचा, यशस्वी होण्याचा, विकसित होण्याचा असावाच; पण तो स्पर्धेने, इर्षेने नसावाच. त्यामुळे विजेत्यांचे अभिनंदन करताना, सर्व सहभागी मित्रांचेही मी तितकेच मन:पूर्वक अभिनंदन करतो; तेवढ्याच स्नेहाने आणि आनंदाने. कोरोनासारख्या महामारीमुळे लादून घेतलेल्या ‘बंदिवासा’त आपण सर्वांनी जो मराठी गझलांचा एक कॅलीडोस्कोपिक / रंगदर्शी अनुभव दिला, त्याबद्दल आपले आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. आपला हा प्रवास, हा स्नेह आणि सामाजिक कार्यात ‘समिधा’ टाकण्याचाच ‘यज्ञ’ आपण सदैव सहभावाने साकार करू, ही ग्वाही आमच्याकडून देतो. आपल्याकडून घेतो.

सुरेश भटांनी मराठी गझल रुजण्यासाठी घेतलेले कष्ट, स्वीकारलेली उपेक्षा, गैरसोय हे सगळे आज आठवण्याची वेळ आहे. गझलेच्या स्वच्छ, सर्वार्थाने निर्दोष, जीवनानुभवाशी प्रामाणिक राहून केलेली अभिव्यक्त आशयघनता येण्यासाठी सातत्यापेक्षा साधना महत्वाची आहे. आपल्या जाणकार प्रतिभेच्या, संवेदनशीलतेला समृद्ध करता येणे शक्य आहे. त्याशिवाय, मराठी गझलेने कवितेला एक निश्चित वळण दिले आहे. नवीन पिढ्यांना व्याकरणाचे भान दिले आहे. याअर्थीच मराठीला अजून समृद्ध केले. किंबहुना, मराठीच्या

समृद्धीची जाण जगाला दिली आहे. या निर्मितीचे आपण पाईक आहोत. या प्रवासाचे पाईक आहोत. (केवळ स्पर्धेचे नाही.) त्यामुळे सुरेश भटांना अभिवादन करून आपले सर्वांचे अभिनंदन करतो. आपला या स्पर्धेचा अनुभव आम्हाला अवश्य कळवा. संवाद चालू ठेवा. आपले सदैव स्वागत आहे.

ज्या उपक्रमाच्या हेतूने आपण एकत्र आलो आहोत, तो अजूनही बाकी आहे.

तोवर आपली काळजी घ्या. इतरांची घ्या. आपले सर्वांचे जीवन अतिशय शांतीचे, समाधानाचे, भरभराटीचे, उत्तम आरोग्याचे आणि यशप्राप्तीचे होवो, ही सदिच्छा ! गझलांचे भरपूर वाचन करा. खूप लिहिण्याची उर्मी, प्रेरणा, स्फूर्ती आणि लालित्य आपणास प्राप्त होवो. आपल्या प्रतिभेचा प्रकर्ष अनुभवण्यासाठी सगळे जग स्वागतार्थ तयार असते. त्याचा आनंद घ्या.

आदरणीय सुरेश भटांना अभिवादन करून आपले सर्वांचे अभिनंदन करतो.

जय हिंद !

## स्पर्धेचा निकाल -

प्रथम क्रमांक – निशा चौसाळकर

द्वितीय क्रमांक – डॉ. स्नेहल कुलकर्णी

तृतीय क्रमांक – महेश मोरे ‘स्वच्छंदी’

विशेष गुणवत्तापर – 
- सुरेश नारायण तायडे
- सचिन साताळकर
- सुनीति लिमये
- प्रा. संजयकुमार बामणीकर
- व्यंकटेश कुलकर्णी

उत्तेजनार्थ –
- अमितकुमार खातू
- विजयकुमार देशपांडे
- चैतन्य कुलकर्णी
- विनोद गहाणे
- केदार पाटणकर

## ऋणनिर्देश –

‘गझल मंथन’, ‘फक्त गझलेसाठी’, ‘मराठी कविता समूह’, ‘उत्स्फूर्त गझलसंग्रह’, ‘मराठी गझलेचा जागतिक संचार’, ‘गजलमित्र’, ‘मराठी गझल कविता’, ‘साहित्यवार्ता’, ‘साहित्ययात्री’ अशा अनेक समाज माध्यम समूहांचे सहकार्य लाभले.

तसेच, दैनिक ‘पुण्यनगरी’, ‘आपलं मन’ या वृत्तपत्रांनीही उपक्रमाची अगोदर व नंतरही नोंद घेतली.

आकाशवाणी, औरंगाबाद केंद्राने आपल्या वृत्तात या घटनेचा उल्लेख केला.

फेसबुक हे माध्यमही खूप प्रभावी ठरले.

मसने ग्राफिक्स, अंबाजोगाई यांनी वेळापत्रकाच्या संकेतानुसार अतिशय कमी वेळेत चोखपणे हवी तशी प्रमाणपत्रे बनवून स्पर्धकांचा आनंद द्विगुणित केला.

---



# आदरणीय परीक्षक ए. के. शेख सरांचा परिचय

नाव : अब्दुलरहमान करीमभाई शेख - ए. के. शेख

जन्म : ३० मार्च १९४६ - मु.पो. पारगाव, सालोमालो, ता. दौंड, जि. पुणे

पत्ता : अ, २ - अंबर अपार्टमेंट, पाटकर वाडा, पनवेल, जि. रायगड ४१० २०६

व्यवसाय : निवृत्त पोस्टमास्तर (एचएसजी-१)

प्रकाशित साहित्य

१. ओंजळ - काव्यसंग्रह १९८६ (राष्ट्रीय पारितोषिक १९८९-९०)
२. गुलदस्ता - प्रातिनिधिक काव्यसंग्रह १९९४
३. जुलूस माझा - काव्यसंग्रह १९९५ (कोकण मराठी साहित्य परिषद पुरस्कार)
४. मोरपिस - मराठी गजलसंग्रह २००२
५. मराठी गजल - मराठी गजलसंग्रह २००७ (अभिव्यक्ती प्रकाशन)
६. आम्ही दोघे - मराठी गजलसंग्रह २००८ (अभिव्यक्ती प्रकाशन)
७. सखी - मराठी गजलसंग्रह २०११ (को.म.सा.प.चा आरती प्रभू पुरस्कार)
८. गजल एके गजल - गजल मार्गदर्शन पुस्तिका २०११
९. काव्यगंध - कवितासंग्रहांचा रसास्वाद
१०. नक्षत्ररेषा - प्रस्तावना : दिलेल्या घेतलेल्या २०१३
११. ऋतू बोलणारे - काव्यसंग्रह २०१५
१२. नवी मुंबईचे गजलकार - प्रातिनिधिक गजलसंग्रह संपादन २०१६
१३. मनातले पुस्तक - आस्वादक समीक्षा २०१७
१४. ध्वनिफिती - सखी, भेट आता तुझी, नभीचा चंद्र, सखीच्या गजला
१५. अमृताची पालखी - गजल दिवान २०१७
१६. गजलवेल - पनवेलच्या गजलकारांचा प्रातिनिधिक संग्रह २०१८
१७. छंदाक्षरी - मराठी गजलांचे छंदशास्त्र २०१९
१८. गजलवेदना - मराठी गजलसंग्रह २०१९ (हा मराठी गजलसंग्रह स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात एमए भाग 1साठी अभ्यासक्रमात लावण्यात आला आहे.)

मुंबई विद्यापीठाच्या प्रथम वर्ष बीएच्या अभ्यासक्रमात बाप ही गजल समाविष्ट करण्यात आली आहे.

२०१५ साली सोलापूर येथे भरलेल्या गजलसागर प्रतिष्ठानच्या ८ व्या अखिल भारतीय मराठी गझल संमेलनाचे अध्यक्ष.

राञ संपेना कशी ही श्वास थकला चांदण्यांचा
सूर्य ही रेंगाळला तर जीव जातो काजव्यांचा

एक चिंधी पेटलेली राख होऊ पाहणारी
तेल प्याली ती बळेने भार वाही सावल्यांचा

फेकला मुद्दा असावा पत्थरासम लक्षवेधी
या असे चर्चेत आपण कीस पाडू कायद्यांचा

चुंबकाच्या दक्षिणेचा उत्तरेला प्रश्न आहे
सारखा होणार आहे का इथे पण सारख्यांचा ?

गाठला मुक्काम तेथे कल्पनेतिल गाव नव्हते
वाट होती वेगळी पण धाक होता सोबत्यांचा

जन्मठेपेचा जुना कैदी खुला होता अचानक
हालणारा स्तब्ध होतो पिंजरा मग फासळ्यांचा



अजय पांडे 'बेवक़्त' - लातूर.

उर्दू आणि मराठीत कविता, ग़ज़ल लेखन. वृत्तपत्रीय स्तंभलेखन. मेघदूत या कालीदासाच्या संस्कृत काव्याचे मराठीत नाट्यरुपांतर. काव्य-गजलसंग्रह - 'गुज़ारिश' , 'गुंजन'.'कळा ज्या लागल्या जीवा' (उर्दू शायरांच्या रचनांचा मराठी रसास्वाद). सामाजिक कार्य व सामाजिक सलोखा यासाठी अनेक पुरस्कारांनी सन्मानित. कला, साहित्य चळवळीत पुढाकार.

*स्त्रग्विणी*

आतल्या आत एल्गार आता नको
चल अगोदर लढू, हार आता नको

सांग मित्रा मला काय चुकतो तिथे
फक्त खोटाच सत्कार आता नको

वांछिले तेच सारे मिळाले कुठे
वागणे मात्र लाचार आता नको

न्याय मिळतो जिथे फक्त तेथेच चल
व्यर्थचा तोच दरबार आता नको

लोकनायक जगी शोभणारा हवा
खेळण्यातील सरदार आता नको



अनिल कांबळे – मुंबई

व्यावसायिक उद्योजक. 'गझल मंथन' या सद्यस्थितीतील सर्वांत सक्रीय व उपक्रमशील समाज माध्यमाचे संचालक. कार्यशाळा, स्पर्धा यांचे यशस्वी आयोजन

रुपाला धरावे कसे आरशाने
तडकतील काचा गुलाबी उन्हाने

गुन्हे पाखरांचे अघोरीच होते
तरीही अडवले कुठे कोटराने


खळी गोड होतीच गालावरी पण
खुलविले तिला लाघवी लाजण्याने

कथा शेवटी पुस्तकाची हसावी
रडावे कशाला सदा माणसाने

कळी लाजली फूल होताच गाली
खरडल्या हजारो कथा मग जगाने

कटाक्षांत जादू तलम जीवघेणी
अनाचार केले तुझ्या पाहण्याने

करू का कुणाचा उगा शोध वणवण?
मला मी न दिसलो अजुनही खऱ्याने



**अभिजीत काळे** - सदनिका क्र. १८, सी – विंग, नवीन त्रिमूर्ती हौसिंग सोसायटी, जी – ब्लॉक, संभाजी नगर, एम.आय. डी.सी. चिंचवड, पुणे – ४११ ०१९

संस्कृत विषयाची आवड. २०१६ पासून भर्तृहरीचे 'नीतीशतक' व कालिदासाचे 'मेघदूत' यावर लिखाण.

दिसते म्हणे जगाला त्या विठ्ठलात आई...
का मग मलाच दिसतो विठ्ठल तुझ्यात आई...?

आई तुझ्या मुलाला कोळून पाज शिवबा
त्याला दिसेल परक्या स्त्रीच्या रुपात आई...

पाहत असेल बहुधा आई मला नभातुन...
डोई पदर ढगांचा धरते उन्हात आई

उसना उजेड ते घर नसते कधीच मागत...
असते स्वतःच तेवत जोवर घरात आई....

काळानुसार गेल्या बदलत पिढ्या मुलांच्या
होती तशीच आहे सगळ्या युगात आई..

आता सुखात त्याची नांदत असेल पत्नी...
सोडून काल आला वृद्धाश्रमात आई....



पिल्लू  तुझे तुला का विसरून जात आहे...?
झाली कुठून भेसळ निक्क्या दुधात आई...?

वेळीच काढ कचरा...टाळू नको खड्यांना...
धान्यासमान पाखड मुलगा सुपात आई...

**आत्तम वामनराव गेंदे -** पालम, जिल्हा परभणी एम. ए. बी.एड., शिक्षक वाचन व कविता,गझल लेखन *महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून ‘बापाची कविता’ हा दीर्घ काव्यसंग्रह प्रकाशित. महाराष्ट्रातील नव्या पिढीचे आश्वासक गझलकार.

बापाच्या बोटाला जडले पोर व्हायचे आपण
बाल्य निरागस जपता जपता थोर व्हायचे आपण

पोरांसाठी दारावरती पदर पसरते कोणी
त्या अगतिक डोळयांमधला चतकोर व्हायचे आपण

कुणास चुकल्या वाटेवरच्या काळोखाच्या रात्री ?
आशेच्या काजव्यातुनी बिल्लोर व्हायचे आपण

बरसायाचे खोल मनाशी जेव्हा ठरते नक्की
रिमझिमतो तर कोणीही, घनघोर व्हायचे आपण

एक गुराखी काठी उंच उगारुन मागे असतो
तोच ठरवतो वाटा, नुसते ढोर व्हायचे आपण

जरुरी नाही शस्त्र उचलणे देशभक्त ठरण्याला
राष्ट्रगीत अक्षय लिहुनी टागोर व्हायचे आपण



- आनंद पेंढारकर

मला माहीत नाही मी कसा आहे
मला तू म्हण,...असा आहे...तसा आहे

भरू शकणार नाही मी तुझी ओटी
मला माहीत आहे मी पसा आहे

मला ती पाहते आहे जगासाठी
तिच्या बटव्यातला मी आरसा आहे

तुझा होणार नाही 'खेळ'खंडोबा
तुझ्या गोटात माझी म्हाळसा आहे

तिच्या डोळयामधे अंजन कसे घालू
तिच्या डोळयात माझी लालसा आहे

कशाला पेरते आहेस तू स्वप्ने
कुठे डोळयात आता वापसा आहे

मला पाहुन तुझ्या मदतीस येणारा
तुझ्या डोळयातला कचरा कसा आहे



आत्माराम नारायणराव जाधव - किरडे महाराज यांचे घर, व्यंकटेश नगर,गंगाखेड जि.परभणी. - ४३१५१४
भ्रमणध्वनी - ९४०३२२०२३० शिक्षक, एम.ए. (मराठी,इतिहास) बी.एड. सक्षम, आश्वासक कविता व गझल लेखन. शैलीदार गायन (तरन्नुम) शैलीतून सादरीकरणासाठी लौकिक. मराठवाड्यातील तरुण वर्गात गझल लोकप्रिय करण्याचे श्रेय.

आटला डोळ्यातलाही पावसाळा
वांझ झाली ही नभीची मेघमाळा

सर्व आहे, फक्त शिक्षण सोडले तर..
राहिली नाही तशी, अन तीच शाळा

मागण्याची सवय इतकी वाढली, की
त्यामुळे तर लागला भाग्यास टाळा

केवढा आवाज आहे भोवताली
ऐकला नाही कधीचा फक्त वाळा

लावले कुब्जेस छातीशी तयाने
शुभ्र होता भावनेने कृष्ण काळा

आपल्या दुःखावरी हसणे जमावे
आसवे दुसऱ्याकरीता फक्त गाळा

ईश्वराला भेटण्यासाठी दलाली-
मागणाऱ्याहून आहे कोण काळा

आढ्यतेने उन्मळुन पडतात झाडे
नम्रतेने वाचतो कायम लव्हाळा

प्रेम केल्यासारखे करतात सारे
प्रेम करणारा खरा, असतो निराळा

भेटलो की केवढा बरसायचा तो
बदललो आपण, बदलला पावसाळा




**कमलाकर आत्माराम देसले -** झोडगे ता. मालेगाव

माध्यमिक शिक्षक, जनता विद्यालय, झोडगे ता. मालेगाव जि. नाशिक


कविता संग्रह : 'ज्ञानिया तुझे पायी', 'काळाचा जरासा घास' व 'बिंब-प्रतिबिंब'

महाराष्ट्र टाईम्स, साप्ता. लोकप्रभा, साप्ता. नगारा, दै. गावकरी, दै. लोकमत, ॲग्रोवन मधून सदर लेखन.

आयुष्यभर रुताया हे शल्य राहिले
माणूसकीत जेव्हा वैफल्य राहिले

हातावरील रेषा गेल्या मिटून पण
हातामधे निरंतर कौशल्य राहिले

गेले निघून जरिही पक्षी नभामधे
कायम पिलांबरोबर वात्सल्य राहिले

बाई घरात तुळशी होऊन नांदली
तेव्हा कुठे जरासे मांगल्य राहिले

संसार,धर्म,नाती मी सोडल्यामुळे
माझ्या घरी तुक्याचे कैवल्य राहिले



**एजाज शेख** - द्वारा, पोस्टमास्टर, भुसावळ, भुसावळ मुख्य टपाल कार्यालय, मॉडर्न रोड, भुसावळ - ४२५२०१
भ्रमणध्वनी – ९६६५२०३१०६ मूळगांव पुसद (अमरावती)
व्यवसाय : नोकरी. मराठी हिंदी उर्दू ग़ज़ल लिहिणे. अनेक मुशायऱ्यांत सहभाग. सक्षम गझल लेखन.

ही कोणाची हयगय आहे का
मनात मृत्यूचे भय आहे का

हार कुणाची आहे यामध्ये
कोणावरती हा जय आहे का

चुकला नाही मृत्यू कोणाला
मरायचे मग हे वय आहे का

मृत्यू वाटत फिरतो दुस-यांना
माणुस इतका निर्दय आहे का

दुस-यावरती सगळ्यांच्या नजरा
कोणावरती संशय आहे का

कुठल्या पुण्याईवर जगतो मी
इतका माझा संचय आहे का



**कालिदास चवडेकर** - ५४,५५, राघवेंद्र रेसिडेन्सी, कुचन नगर, विठ्ठल मंदिरासमोर, सोलापूर
शिक्षक - आशा मराठी विद्यालय, सोलापूर
कवितासंग्रह: 'आत्मभान',
गझल लेखन मार्गदर्शनपर पुस्तक - 'गझल तुझी माझी'.
आगामी - 'हज़लावती' – हज़लसंग्रह

वेड लागण्याआधीचा क्षण आठवतो आहे
वाजलेत कोणाचे पैंजण .. आठवतो आहे

कुणीतरी वाट पाहिलेली होती माझीही
कुठल्या दारी होते तोरण .. आठवतो आहे

फिरता फिरता खूप लांब आलेलो आहे मी
पण आता फिरण्याचे कारण आठवतो आहे

आठवला आहे विश्वाला नम्रपणा माझा
आता मीही माझे मीपण आठवतो आहे

कर्जाचा शेवटचा हफ्ता भरून आलो, पण
काय ठेवले होते तारण .. आठवतो आहे

सूड घ्यायला सांगत आहे पंख विव्हळणारा
होती कुठल्या हाती गोफण .. आठवतो आहे

त्यालासुद्धा आठवते ती कुठेच नसलेली
आणि तिला नसलेला तोपण आठवतो आहे

रामाच्या वेशात छानसा खुलून दिसतो , पण
नजर पाहुनी त्याची रावण आठवतो आहे



**गोविंद नाईक -** ए - २०२ , नव रविराज सोसायटी, जयहिंद कॉलनी, गुप्ते रोड, डोंबिवली (प ) ४२१२०२ संपर्क - ७७३८३६९४७५ व्यवसायाने चित्रकार. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् या नामांकित संस्थेतून बी. एफ. ए. पदवी. वैशिष्ट्यपूर्ण शैलीतील नव्या संवेदनांची, नव्या प्रवाहांची ओळख करून देणारी गझल. 'गझल टॉकीज' या अभिनव कार्यक्रमाची निर्मिती.

कधी सांभाळला ह्यांनी, कधी सांभाळला त्यांनी
तरी पण जीव माझ्यावर, कधी ना लावला त्यांनी ....

कधी ना लावली माया, कधी ना प्रेमही दिधले
परंतू हक्क माझ्यावर, तसाची राखला त्यांनी ....

किती मी विनवण्या केल्या, कितीदा पायही धरले
दिलेला शब्द हो त्यांचा, तरी ना पाळला त्यांनी ....

कसे हे दु:ख मी माझे, जगाला आज सांगावे
गळा केंव्हाच केसाने, खुबीने कापला त्यांनी ....

कसे दु:खास मी माझ्या, असे सोडून हो देऊ ?
उतारा सातबाराचा, सुधारित काढला त्यांनी ....



दिवाकर चौकेकर - डी-१०३, आवास रिव्हरफ्रंट,
गिफ्ट सिटी रोड, रांदेसन, गांधीनगर - ३८२ ००७
(गुजरात) भ्रमणध्वनी : ९७२३७ १७०४७

हल्ली गुजरातमध्ये स्थायिक. 'तुझ्यासारखी तू !' हा गझलसंग्रह आणि 'बिंब – प्रतिबिंब' हा कविता संग्रह (गुजराती भाषांतरासह ) प्रकाशित. बँकेतून सेवानिवृत्त. 'गझल वाढदिवसाची' मराठी गझलकारांसाठी चालवलेले सदर लोकप्रिय.

तगर फुलणार आहे शेवटी माझ्या विचारांची
तुला कळणार नाही आर्तता सामान्य शब्दांची

म्हणत आहेस तू वेडा मला ऐकून इतरांचे
तुला भाषा कशी समजेल माझ्या हातवाऱ्यांची

वहीच्या आतमध्ये राहिलेले खिळखिळे धागे
कहाणी सांगतिल का फाडलेल्या सर्व पानांची

कमी नाहीत झाडे जी गवसली आपल्याला, पण
किती पडणार आहे सावली निष्पर्ण झाडांची

पुढे त्यांच्या उभी केलीस जी ती भिंत आहे मी
पुसत आहे कशाला तावदाने बंद खिडक्यांची



**जयदीप शरद जोशी** – र-२/५०२, अँथूरियम, नीलकंठ ग्रीन्स, ठाणे (पश्चिम) वाणिज्य शाखेतून पदवीधर, सनदी लेखपाल (सीए), २०१२-१३ पासून कविता लेखन. गझल संग्रह – ‘दखल’ (२००७). अनेक मुशायऱ्यांतून सहभाग. गझलेबद्दल 'सामना' - 'फुलोरा' मध्ये प्रदीर्घ लेखमाला. एक्का फाउंडेशन – ‘युवा चेतना’ पुरस्कार (२०१८). अतिशय वेगळ्या धाटणीची, अंतर्मुख करणारी, मनस्वी, अनुभूतीकारी, सशक्त गझल. उत्तम रेखाचित्रकार. संगीताची जाण. अनेक वाद्य वादनाची आवड.

भांडते बसते विचारत सावली माझी मला
चालवत नेतोस का तू रोज अनवाणी मला,.,

उघडतो खिडकी घराची रोज मी शहरातल्या
सुन्नसा बसतो तिथे अन् पाहतो गावी मला

एक हा दुःखी किनारा मी बुडत असल्यामुळे
एक रडतो यामुळे की गवसली काडी मला

बोलले माझेच मन मी घेतले जेव्हा जवळ
पाहीजे याहून आता कातडी जाडी मला..

रोज थोडावेळ बहिरेपण हवेसे वाटते
ऐकता येते स्वतःची त्यामुळे हाळी मला

स्पर्श पदराचा खरोखर भावला हे सांगतो
पारखाया नीटशी कळते कुठे साडी मला!

वाटले बैचैन जाताना तुझ्या गावावरुन
बोललो मित्रास मग मी लागते गाडी मला

गाडले आधी मनाला मग तुझ्या पुरल्या सयी
या उपर काहीच हल्ली आठवत नाही मला!



**दत्तप्रसाद जोग –** ६६ / ६५, 'आनंदघन', सोनाळ सत्तरी, वाळपई, गोवा – ४०५ ४०६ बी. एस्सी. (कृषी) एम. ए. (मराठी). गोवा कृषी संचालनालयात अधिकारी. बा. भ. बोरकर स्मृती, यशवंत साहित्यिक – असे पुरस्कार. कविता संग्रह – 'अंदाज'. नाट्यगीत संग्रह – 'नाट्यमधुरा', 'गीत रामायणा'चा हिंदी अनुवाद भारत सरकारतर्फे प्रकाशित होणार. विविध अल्बमसाठी गीते, गझला, कविता यांचे लेखन. मान्यवर संगीतकरांच्या मैफलींचे निवेदन.

अत्तराचा जणू एक फाया गझल
लागते अंतरी दरवळाया गझल

घेतल्यावर तुझा हात हातात मी
लागते मग मलाही सुचाया गझल

सूत जुळणार माझे तुझे चांगले
लागली जर तुला आवडाया गझल

घाव करते नव्याने तुझी आठवण
लागते आणखी भळभळाया गझल

बाळगू मी कशाला उन्हाची तमा
देत आहे मला दाट छाया गझल

वाट पाहू कशी राघवाची अता
रोज येते मला उद्धराया गझल

काय मागू तुला ईश्वरा आणखी !
लागला एक वेडा लिहाया गझल



निशांत पवार - तुकाई संगमेश्वर मंदिराजवळ
ओंकारेश्वर नगर, तरोडा खुर्द, मालेगाव रोड, नांदेड.
भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या परभणी शाखेत विकास अधिकारी.विविध नियतकालिकांतून कविता प्रसिद्ध.
कविता संग्रह 'ओनामा' प्रकाशित.

प्रतिमा आणि वास्तव यातील फरक बघा...
तीर्थ होतसे शिंपडताना उदक बघा...

खरोखरी ही जादूगर आहेच व्यवस्था
हंसाला ही कशी बनवते बदक बघा...

कुठे सुरू झालेली यात्रा कुठे संपते
गंगेच्या गाळात सापडे कनक बघा...

पराभवाचे शल्य असावे अल्प घडीचे
आशेची डोळ्यात नव्याने चमक बघा...

व्यक्त होवूनी जन्म नव्याने पुन्हा मिळे
आपण आपल्या व्यक्तित्त्वाचे जनक बघा...

सूचनेचा सारांश कदाचित असेल हा
का लिहीलेली कांही अक्षरे ठळक बघा...

पक्षाचा,संघटनेचा वा असो कुणीही
कामगार आहे...कामाचा उरक बघा...



**प्रफुल्ल कुलकर्णी** - 'वरलक्ष्मी नीलयम ' , घ.नं. २७, यशवंत नगर ( विस्तारित ), नांदेड. भ्रमणध्वनी - ९९२१२ ७२४५६. कविताश्री, कवितारती, म.टा., लोकसत्ता, सकाळ सह अनेक प्रकाशनांमधून कविता व गझला प्रसिद्ध. 'मराठवाड्याची मराठी गझल ' हा अभ्यासपूर्ण लेख प्रकाशित. स्वा. रा. ती. म.विद्यापिठाच्या अभ्यासक्रमात गझल समाविष्ट. दोन एकांकिका. दोन नाटकांसाठी गीत लेखन.

ही दिशा नव्हतीच माझी, हा ऋतू नव्हताच माझा
जन्मलो येथे असा मी हा गुन्हा झालाच माझा

मी जुन्या पत्रातल्या त्या जीर्णशा ओळीप्रमाणे
तू जराशी काळजी घे श्वास हलके वाच माझा

श्वास घेण्याची लढाई, मुक्त होण्याचा इरादा
हा कधीपासून मजला सोसवेना जाच माझा

जन्मलो होतो जसा आता कुठे आहे तसा मी
चेहरा दिसतो धडावर या मला भलताच माझा

चार ओळी खरडल्या अन् दोन पाने खर्च केली
सोडले हे एवढे तर जन्म हा वायाच माझा



**प्रमोद बबन खराडे** - २४४ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२
मो. ९७६३८२८२५१
'मनस्पंदन' आणि 'समतोल' हे दोन गजलसंग्रह प्रकाशित. 'एकांताचं स्वगत' मनोगतांचा संग्रह प्रकाशित. नसीमा फाउंडेशन पनवेल, हुतात्मा राजगुरू साहित्य परिषद, रंगत संगत प्रतिष्ठान, कविता रसिक मंडळी या संस्थांचा गजल लेखनासाठीचा पुरस्कार. उत्तम गझल मार्गदर्शक. शांत स्वभाव, समंजस भूमिका व सक्षम गझल.

पावलोपावली एक मारेकरी , सांग जाऊ कुठे
फक्त दिसतात काटेच रस्त्यावरी ,सांग जाऊ कुठे

रात्र दाटून आली चहूबाजुनी घर दिसेना मला
त्यातही भर म्हणुन पावसाच्या सरी , सांग जाऊ कुठे


चालणे बोलणे ऐकणे वागणे तूच म्हणशील ते
काम आहे मला हेच सध्यातरी सांग जाऊ कुठे

त्या दिशा अन् क्षितिज साद घालोत पण झेप घेऊ कशी
या घराची उभी भिस्त माझ्यावरी सांग जाऊ कुठे

शेत जुमला जमिन सर्व गेले तरी कर्ज बाकी अजुन
त्यात हातातही ना अता नोकरी सांग जाऊ कुठे

घर उपाशी निजे रोज गावी नि मी जेवतो या इथे
घोटते जीव शहरा तुझी भाकरी, सांग जाऊ कुठे

हे कळेना मला सत्य वागून वणवण स्वतःची करू
की असत्या तुझी मी चढू पायरी,  सांग जाऊ कुठे?



**प्राजक्ता पटवर्धन** – ए १८ , ऋतुजा रेसिडेन्सी, मॉडर्न कॉलनी, कोथरूड, पुणे – ३८. शिक्षिका. मालिका, चित्रपट पटकथा, गीतलेखन. ('किती सांगायचंय मला', 'प्रीतीपरी तुजवरी'इ.) काव्यसंग्रह ('फुलांची आर्जवे', 'मौनाची आर्जवे') ललितलेख संग्रह -('कचखड्यांची नक्षी') बुलडाणा साहित्य संघातर्फे 'आद्य गझलकार अमृतराय' पुरस्कार.

नाही म्हणावयाला आता असे करू या
जे जे करावयाचे, ते ते तसे करू या...

जन्मासवेच मृत्यू होता लिखीत माथी
आहे मरायचे, तर मानासवे मरू या...

दिसती सभोवताली भयमाखले किनारे
पाण्यात संयमाच्या मनमोकळे तरू या...

साशंक पाहसी का माझ्याकडे असे तू
स्वप्नातल्याप्रमाणे सत्यास पांघरू या...

झाले ऋतू कशाने बेरंग जीवनाचे...?
जे जे उडून गेले, ते रंगही भरू या...

फांदीवरील पक्षी गाती नवे तराणे
म्हणती 'सुरेल गाणे पुन्हा जुने स्मरू या...'

देशास तोडण्याला लपले गनीम येथे
हातात हात या रे सारे पुन्हा धरू या...



बंसी कोठेवार - मु.पो. पळसगाव (जाट), ता.- सिंदेवाही, जि.- चंद्रपूर. 'कल्पतरू' पतसंस्थेत व्यवस्थापक. चित्रकला, काव्यलेखन. 'कलाध्यापक पदविका' प्राप्त. विविध स्पर्धा व प्रदर्शनात पुरस्कार. सामाजिक. 'संस्कार भारती', विदर्भ प्रांत, चित्रकला विधाप्रमुख.

आसवांना रंग नाही हे किती झाले बरे
रोज असती रंगली मग या उशीची अस्तरे

पापणीच्या आत ओल्या राहतो तो सारखा
भावनांची  वीट घेवुन ,बांधली त्याने घरे

आठवांचे आत काही राहिले होते ठसे
त्यामुळे दिसतात हल्ली काळजावरती चरे

कासवाची हार नोंदा ही सशांची मागणी
चूक आहे लेखकाची मारले ज्याने खरे...

बोलता बोले उसासा बोचऱ्या थंडीतला
वेढुनी घे साजणा रे  श्वास अवघा थरथरे



चांगल्याही वागण्याला पेच  पडतो कैकदा
काळ बनती प्रश्न काही काळ देतो उत्तरे

जीव झाला मोकळा अन पोचला देवाघरी
देव रडला पाहुनिया काळजाची लक्तरे

**बापू दासरी ऊर्फ उमाग्रज** – १५७, 'अनुग्रह', स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, नांदेड
एम. कॉम., एलएल. बी., एम.एस. डब्ल्यू. समाज कल्याण अधिकारी. दीपा निसळ प्रतिष्ठान, अहमदनगर व कवी कट्टा पुरस्कार. साखरपुड्याची लावणी, सुरेखा पुणेकर यांनी गायिली. कविसंमेलन व मुशायऱ्यांचे प्रभावी सूत्रसंचालन.  यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नांदेडचे सदस्यत्व. मान्यवर गझलगायक, गझलकार यांच्या कार्यक्रमांचे आयोजन.

अंतरीची एक इच्छा अंतरी राहून गेली
जिंदगीला शोधण्यातच जिंदगी संपून गेली

गप्प होतो मी तरी पण यार ही चर्या दरिद्री
माझिया आधीच माझी दुर्दशा सांगून गेली

देशही जाईल झोपी पूर्ण पाठोपाठ त्यांच्या
माणसे देशातली जर जाणती झोपून गेली

काल फांद्यांवर जयांचा माझिया होता निवारा
पाखरे ती आज माझ्या केवढ्या लांबून गेली

जन्मभर नव्हतोच देही मी खरोखर आपल्या तर
जन्म माझा मग बला ती कोणती कंठून गेली ?

शिक्षणाचा गर्व माझा पार मग उतरून गेला
गोष्ट ऐसी ती अडाणी माणसे बोलून गेली



**मसूद पटेल** - नॉटिंग हिल सोसायटी, फ्लैट नंबर ६६०३, 'सी 'बिल्डींग, पुण्यधाम आश्रम रोड, मु. कोंढवा बुदरुक पुणे, ता. हवेली जि. पुणे. पिन कोड ४११०४८.
भ्रमणध्वनी – ९६०४६५३३२३ बी. कॉम. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सेवेतून निवृत्त. सामाजिक जाणिवेची ज्वलंत व चिंतनीय गझल. अनेक मुशायऱ्यांतून सहभाग.

वेशीत स्वागताला राव नाही
उरले अता तसे हे गाव नाही

दे कोठडी हवी तर काळजाची
मी प्रेमचोर आहे साव नाही

गेला बुढा स्मशानी एकदाचा
आता घरात कावाकाव नाही

गेलीस दूर माये का अशी तू
या लेकरा◌ास अजुनी नाव नाही

समजू नका गड्यांनो हारलो मी
मी मांडला पटावर डाव नाही



**बाळ पाटील –** "मुक्ताई", २८ / २७५, रिलायन्स ऑफीस समोर,डी आय.सी.बायपास रोड, उस्मानाबाद – ४१३५०१

'वेंधळा' काव्यसंग्रह प्रकाशित. अनेक काव्य संमेलनात सहभाग. काव्य क्षेत्रातला 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा गौरव पुरस्कार' प्राप्त. तिरकस अंगाने खुमासदार शैलीत कुप्रथा व कुनीतीवर प्रहार करणारी, उपहासगर्भ गझल.

सदिच्छा गझल

नका होऊ नव्या पानांमुळे बेभान वृक्षांनो
पुन्हा घालूच आम्ही मानवी थैमान वृक्षांनो

पुन्हा दिसणार नाही ती पुण्याची शान वृक्षांनो
कधी जे रान होते, आज रेगिस्तान वृक्षांनो

मुलायम हायवे झालेत तुमच्या पार्थिवांवरती
तरी करता कडेने महिरपी नादान वृक्षांनो

फुले पाने फळे छाया वगैरे ठीक आहे पण
करा केव्हातरी वृत्तीच तुमची दान वृक्षांनो

मुलांना सूरपारंब्या, मुलींना देत जा झोके
तुम्ही निपजू नका केव्हाच नि:संतान वृक्षांनो

स्वतःला धड उभे ना राहता येते तरी फुलते
अश्या वेलीमुळे होता तुम्ही सज्ञान वृक्षांनो

तिला ह्या सावलीतच मागणी मी घातली होती
कुण्या जन्मात करणारात कन्यादान वृक्षांनो



**भूषण कटककर 'बेफ़िकीर'** - मराठी गझलक्षेत्रातील नव्या पिढीतील अभ्यासक, मीमांसक, समीक्षक, मार्गदर्शक. सांस्कृतिक व सामाजिक चळवळीच्या उभारणीत पुढाकार. 'कविता रसिक मंडळी'ची स्थापना. समाजाच्या विविध स्तरातील साहित्यनिर्मितीच्या परिचयार्थ वैशिष्ट्यपूर्ण संयोजनाबद्दल विशेष लौकिक. अभिनव शैलीतील नव्या जाणिवांच्या मराठी गझल व कवितेच्या सक्षम अविष्काराबद्दल लौकिक. साभ्यास सटीक लेखन व सडेतोड, पण संवेदनशील भूमिका.

भाळतो जो तो तुझ्यावर..मी कुठे नाही म्हणालो..!
मानले पण तू मला 'वर'..मी कुठे नाही म्हणालो..!

ओठ ओठांना भिडू दे गोड होऊ दे मनाला,
देह नांगर, पेर साखर.. मी कुठे नाही म्हणालो..!

बघ फुगा तू "मी पणाचा" एकदा फुटणार नक्की,
पाहिजे तितकी हवा भर..मी कुठे नाही म्हणालो..!

रोजचा संशय नको हा, एकदा बोलून घे तू..
तू तुझे म्हणणे खरे कर..मी कुठे नाही म्हणालो..!

प्रेम द्यावे लागते मग प्रेमही मिळते खरोखर.,
त्या विना कोणी न साक्षर..मी कुठे नाही म्हणालो..!

घास मजला दे भरू तू ह्या भुकेल्या माणसांना,
मग भले तू फाड छप्पर..मी कुठे नाही म्हणालो..!



**महेन महाजन** - मु. पो. 'सहवास' शरद नगर, आंजी (मोठी) ता. जि. वर्धा
M. A. (मराठी) व्यवसाय - शीतपेय वितरक, छंद - वाचन आणि लिखाण. अनेक मुशायऱ्यांतून सहभाग.

# उबग!

इतका भवती भरून हा सगळाच उबग!
कधी कधी मज माझाही नुसताच उबग!

क्षणाक्षणाची सोय सुखाची केली मी..
इतके करूनही मागे उरलाच उबग!

काढत बसता मिरवत असता रात्रंदिन..
तुम्हास हा लखलाभ असो तुमचाच उबग!

असे वाटते संपत आले जग आता..
मायेलाही मायेचा भलताच उबग!

एकदाच मी पिऊन सगळा संपवला..
मला न आता कोणा कोणाचाच उबग!



**योगेश पद्माकर वैद्य** – २ / १६ए ,टाटा कॉलनी, माहुल रोड,चेंबूर, मुंबई, ४०००७४ भ्रमणध्वनी - ९८२०५ १०६१२
वरिष्ठ अभियंता, टाटा पॉवर. गझल,कविता लेखन, छंदशास्त्र अध्यापन, कविता संकल्पनात्मक सादरीकरण

क्षण बेरंगी सजवत बसतो
रोज उदासी वाचत बसतो

शून्यामध्ये नजर राहते
नुसते चॅनेल बदलत बसतो

पानगळीच्या जुनाट गोष्टी
नव्या ऋतुंना सांगत बसतो

जे कधीच घडणारे नसते
त्याची स्वप्ने पाहत बसतो

तू नसल्याचे टाळत जातो
तू असल्याचे गिरवत बसतो



या देहाला सवलत नसते
रोज मनाला मारत बसतो

असे नेमके काय हरवले ?
काय एवढे शोधत बसतो ?

**प्रा. रूपेश देशमुख-** वार्ड क्र. ०४, जाधव नगर, राधिका लॉन जवळ, एक्सप्रेस हाईवे, नाचनगाव, पुलगांव, ता- देवळी, जि वर्धा ४४२३०२

१९९५ पासून काव्यलेखन. नियतकालिकांतून कविता, गझल प्रकाशित. उर्दू , मराठी, हिंदी साहित्य वाचनाची आवड. वरिष्ठ महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे अध्यापन. स्वशैलीची प्रत्ययकारी गझल लिखाणाबद्दल लौकिक.

श्वास दबल्या विस्तवाचा धूर आहे
अन् उभे आयुष्य बघ कापूर आहे

लागल्या तेथे स्मशानाच्या खुणा तर
जा पुढे निश्चित तिथे गोपूर आहे

कालचा तंटा सुरा-तालात होता
आजचे गाणे किती बेसूर आहे

काय आताशीच माराव्या बढाया
आपली अद्याप दिल्ली दूर आहे

जर दिसे सारेच जग कंटाळवाणे
जग नव्हे डोळाच मग बेनूर आहे

देश धर्माच्या सिमा फुंके दमाने
तो उद्याच्या मानवाचा ऊर आहे

चाल दहशत पाय दहशत मार्ग दहशत
मग पुढे सर्वत्र हुर-अंगूर आहे

केवढी शालीन यांची झुंडशाही
लोकनेताही किती मजबूर आहे

ठार वा पाळीव केले माणसांना
काय धर्माहून काही क्रूर आहे

ऐक, टाळ्या मागण्याची गोष्ट नाही
पण तुझा हा शेर फार निझूर आहे.

**शिवाजी जवरे –** ज्येष्ठ गझलकार, अभ्यासक, समीक्षक, मार्गदर्शक. अनेक ‘गजलसागर प्रतिष्ठान’च्या सर्व अखिल भारतीय मराठी गझल संमेलनांतून अभ्यासपूर्ण व्याख्याने. खुमासदार शैलीतून मराठी गझल व कवितेचा परामर्श. स्पष्ट भूमिका व विनोदप्रचुर शैली. व्यंगचित्रकार. अनेक मासिकांतून लेखन व व्यंगचित्रे प्रसिद्ध.

आठवणींची वीज चमकली कशी अचानक
ओढ तुझी मग पुन्हा लागली कशी अचानक

शुष्क कोरडे होते डोळे दुष्काळासम
पापण्यातुनी धार लागली कशी अचानक

रितीच होती धरणी सारी खिन्न मनाची
तुझ्या स्मृतींनी अखंड भरली कशी अचानक

ओळ एकही सुचली नव्हती कितीक वर्षे
हृदयामधुनी गज़ल उतरली कशी अचानक

अंधाराने व्यापुन होते जीवन सारे
सूर्याची ही माळ उजळली कशी अचानक

आस, अपेक्षा, उमेद, इच्छा कसली नव्हती
उल्हासाची नदी उगवली कशी अचानक

उजाड होते सारे अंगण सारा परिसर
तुला पाहता बाग बहरली कशी अचानक

दिशाहीन अन मुकेच वादळ थिजून होते
वाऱ्याला मग नशाच चढली कशी अचानक

मेंदूमागे दडली होती काळी स्वप्ने
रंगबिरंगी पुन्हा जाहली कशी अचानक

ठाण मांडुनी घरात होते एकाकीपण
मात्र जगाशी मैत्री जुळली कशी अचानक

पानगळीचा मोसम आणि वणवा असता
'इक्बाल' तुझी कळी उमलली कशी अचानक



डॉ शेख इक्बाल मिन्ने - Head of Radiology Department- India Institute of Medical Science and Research WARUDI ,Badnapur, Dist: Jalna.
MBBS,DMRD,DMRE,BGL, LL.B., LL.M., DMJFS

मराठी गजलेवर Ph.D. सुरू.

संस्थापक अध्यक्ष:मुस्लिम मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळ

प्रवर्तक : औरंगाबाद जिल्हा अमन कमिटी, सामाजिक न्याय मंच.

गजल संग्रह : 'जखम काळजाची', 'अस्वस्थ समाजाच्या मनातलं काही'

काव्यसंग्रह : 'माझ्या तुझ्या कविता', 'मी टेकले नाहीत हात अजून'.

मराठीत पहिला रुबाई संग्रह: 'रुबाइयात'

ध्वनिमुद्रिका : 'ग़ज़ल बोलते तेव्हा' 'तू पुन्हा स्वप्नात सजना'
'प्राजक्ताच्या फुलाप्रमाणे'

चित्रपट गीतलेखन : 'भंडारा', 'नातं', 'चुकीची मिश्टेक'.

पिंजरे निघाल्याची बातमी खरी नाही
पाखरे उडाल्याची बातमी खरी नाही

जंगलास ह्या साऱ्या आग लागली आहे
फक्त झाडपाल्याची बातमी खरी नाही

या क्षणी जरी सारे शांत वाटते आहे
आलबेल झाल्याची बातमी खरी नाही

लोक एकमेकांशी भांडतात भांडू द्या
मात्र तेढ आल्याची बातमी खरी नाही

शोध घेतला तेव्हा हे निदर्शना आले
तू दिल्या हवाल्याची बातमी खरी नाही

टाळले अनेकांनी शेवटी जिथे येणे
मी तिथे न आल्याची बातमी खरी नाही

"ठेवतोच मी आहे आजही भरोसा" पण
हे कुणी म्हणाल्याची बातमी खरी नाही

लागली जरी नाही आजही किनाऱ्याला
नाव ती बुडाल्याची बातमी खरी नाही

ही तिला भविष्याने साद घातली आहे
पोर ती पळाल्याची बातमी खरी नाही

बोलतील उत्साही पत्रकार हेही, की
"बातमी मिळाल्याची बातमी खरी नाही"

आजकाल वाटाया लागले असे आहे
की बिना मसाल्याची बातमी खरी नाही



**सिद्धार्थ भगत** – ८ ब, ''मित्र', बोरुंदिया नगर, यवतमाळ ४४५ ००१.
मराठी भाषा विभागप्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव (जि. यवतमाळ). दलित चळवळ व दलित साहित्य चळवळीत कार्यशील.
ज्येष्ठ साहित्यिक व अभ्यासक. वंचितांच्या व्यथांना वाचा देणारी ज्वलंत व झुंजार गझल व कविता. ६ पुस्तके. 'युद्धयात्रा', 'अस्वस्थ मनाच्या नोंदी', 'यापुढे माझी लढाई' इ. गाजलेले गझलसंग्रह. मराठी व गुजराती गझल, तसेच प्रेमचंद यांच्या साहित्यावर संशोधन. अ.भा. संमेलनांतून सहभाग. रा. शाहू महाराज, भाऊसाहेब पाटणकर, सुरेश भट, पद्मगंध प्रतिष्ठान, कवी अनंत फंदी काव्य, साहित्य साधना, कुसुमाग्रज प्रतिष्ठान अशा अनेक मान्यवर पुरस्कारांनी सन्मानित.

**सदिच्छा गझल**

दिवे लागायच्या वेळी पुन्हा परतून आलेले
मनाच्या उंबऱ्यावरती मळभ दाटून आलेले

जणू हा पाठशिवणीचा जसा की खेळ झालेला
कुणाची सावली होती कुणाचे ऊन आलेले

तसे येणारही नव्हते तिन्हीसांजेस भरते पण
रिते झाले मनाच्या आतले साचून आलेले

कशी कळणार कोणाला व्यथा माझी-तुझी आता
मला लिहिताच नाही येत जर आतून आलेले

बहाव्याच्या फुलांचे ताटवे बहरात होते पण
मला गुलमोहराचे दुःखही लगडून आलेले

तुझी ती ओळ कवितेची जिथे ऐश्वर्य सापडते
तुझे फकिरीतले संदर्भ मी चुंबून आलेले

तुझे ते पान कोरे पाहिले अन वाटले भेटू
तुझ्या कविताच नाही तर तुला वाचून आलेले

----------------------------------------------------------------------------------------------------



**श्रीपाद अरुण जोशी** - गोरेगाव, मुंबई. भ्रमणध्वनी – 9730730222
मूळ गाव- केलवड, ता राहता, जि. अहमदनगर एम. ए. , एम.फील., सेट (इंग्रजी), प्राध्यापक (इंग्रजी) गझलकार, कवी, गीतकार. स्टार प्रवाह वरील ‘साथ दे तू मला’, ‘जिवलगा’, ‘रंग माझा वेगळा’ ह्या मालिकांचे शीर्षकगीत. ‘जाणिवांचे दिवे’ या कवितासंग्रहास 'अविनाश ओगले काव्यरत्न पुरस्कार'.

सदिच्छा गझल

ये सख्या दे हात तू ही रात माझी
आज भिजण्या मागते बरसात माझी

चक्रवाताने जरी उच्छाद केला
तेवती राहो दिव्याची वात माझी

ख्याल गावा वाटतो मज रोज रात्री
का पुन्हा बसले विराणी गात माझी

थांब म्हणते अंबरीच्या चांदण्यांना
का सरे मधुरात ही निमिषात माझी

कूस तू वळवून घेता पाहिले मी
ही तनू भिजली नसे गंधात माझी

लाज सांभाळून जगणे दिव्य आहे
झाकली संवेदना वस्त्रात माझी

एवढे मी मागते मुरलीधराला
बासरी करशील का ओठात माझी

**प्रा. सुनंदा पाटील** गझलनंदा - बी / ५०३ , जी.एन. रेसिडेन्सी, विजय पार्क, मिरा रोड (पूर्व), जि. ठाणे – ४०११०७
कवयित्री , लेखिका, गझलकारा , वक्ता. ११ पुस्तके प्रकाशित, राज्य शासनाचे अनेक सन्माननीय पुरस्कार. साहित्य , सामाजिक व इतर क्षेत्रातील पुरस्कारांनी सन्मानित गझल तंत्राचे मार्गदर्शन, गझल व कवितांचे कार्यक्रम.



प्रश्न एकच सतावतो आहे
मी दिवे काय लावतो आहे?

विश्व उजळून टाकण्यासाठी
मी मला आग लावतो आहे

काय शहरात येउनी केले?
धावतो फक्त धावतो आहे

तंग काळीज फार शहराचे
मी कुठे त्यात मावतो आहे

भूक बिनचूक खायला उठते
मी तिला रोज चावतो आहे

लोक श्रद्धा विकून खाणारे
देव त्यांनाच पावतो आहे

मी हवे त्यास आवडत नाही
मी नको त्यास भावतो आहे

पाळतो फक्त वेळ मौतीची
हेच नाते निभावतो आहे

पाखरा, ये फिरून माघारी
गाव माझा खुणावतो आहे



**संजय नाना गोरडे 'सौभद्र'** - फ्लॅट नं ०१, साईदर्शन अपार्टमेंट, सर्वे नं. १२३, ए २ / २ बी / प्लॉट – ०३, निगळ पार्क, विठ्ठल रुख्मिणी मंदिराजवळ, शिवाजीनगर. पोस्ट अशोकनगर, सातपूर, नाशिक – ४२२ ०१२
भ्रमणध्वनी ७२७६० ९१०११
बी.ए. -मराठी, बी.ए. एम.सी.जे. (मास कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझम्)
नोकरी - महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा, नाशिक.
साहित्य, संगीत, पेंटिंग, फोटोग्राफी.
कविता / गझलसंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

सौख्य कुणाला कळले आहे
दुःख कुणाचे टळले आहे

प्रत्येकाच्या स्वप्नांचे घर
डोळयांदेखत जळले आहे

तुझ्या स्मृतींना विसरायाला
खूप मनाला छळले आहे

चित्तपाखरू पुन्हा नव्याने
तुझ्या दिशेने वळले आहे

आभाळाच्या हृदयाचे घर
पुन्हा बोलले, गळले आहे



**संजय शिंदे** - सी- ३०२, श्री साई करिश्मा को.ऑ. सोसायटी, वागाड नगर समोर, रामभाऊ म्हाळगी गार्डन जवळ, रामदेव पार्क रोड, मीरा रोड पूर्व, ठाणे – ४०११०७. भ्रमणध्वनी - ९८९२२ ७६८९१

उत्कर्ष मंदिर, मालाड येथे शिक्षक. अष्टगंध प्रकाशन ही पुस्तक प्रकाशन संस्था. आजवर एकूण ३० पुस्तकांचे प्रकाशन. अनेक एकांकिकांच्या लेखन, दिग्दर्शसाठी पारितोषिके. ‘मु.पो.कविता’ या नव्या-जुन्या पिढीतील कवींच्या काव्यसादरीकरण कार्यक्रमाचे ३० प्रयोग.

मराठी गझल ही पुढे येत आहे
मराठीसही ती पुढे नेत आहे

व्यथांनी करावी मशागत मनाची
अशा आशयाचे तिचे शेत आहे

निराकार, निर्गुण अशा वेदनेचा
तिचा शब्द एकेक संकेत आहे

जगाया पुरेशी तिची प्रेरणाही
तिचा श्वास आश्वासने देत आहे

तिच्या लौकिकाचा करी दिव्य हेवा
यशाची कथा ह्या असूयेत आहे

तिचा भाव अभिजात, लज्जेप्रमाणे
तिचे सत्य, सौंदर्य ... लज्जेत आहे

नशा व्यक्त होण्यातल्या धन्यतेची
सुराहीतुनी मी तिच्या घेत आहे

दिली देणगी ही मराठीस ज्याने,
'सुरेशा'स त्या, ती दुवा देत आहे.

**प्रा. डॉ. संतोष कुलकर्णी** – स्वेच्छानिवृत्त प्राध्यापक व अधिष्ठाता, पशुवैद्यक महाविद्यालय, महराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ. ‘मौनात एकट्याशी’ हा कवितासंग्रह – यात काही गझला.

रिकामा वेळ जाईना खडा टाकून पाहू का ?
निवळल्या स्वच्छ पाण्याला जरा ढवळून पाहू का?

दिले जोडून बाबांनी पुन्हा आधी जसे होते
नवे मिळणार नाही तर जुने मोडून पाहू का ?

स्वतःची दृष्ट लागावी अशी आहे सखी माझी
महाली रम्य स्वप्नाच्या तिला लपवून पाहू का ?


कितीदा आठवावे पण कुठे होते तिचे येणे...
कुणी केली तिला बंदी तिथे जाऊन पाहू का?

जरासा स्पष्ट होताना पुन्हा अस्पष्टसा होशी..
मनाच्या आडपडद्यावर तुला गिरवून पाहू का ?

हवेसे बिंब उमटावे तसा हा आरसा केला
पुन्हा या चेहऱ्यालाही जरा निरखून पाहू का ?

जसा मी लागलो वाचू स्वतःला वाटलो अवघड
जगाचे क्लिष्ट पुस्तकही अता मिटवून पाहू का ?

मनाने दूर भरकटतो स्वतःशी बोलणे नाही...
तुला मी सांग हेमंता जवळ घेऊन पाहू का ?



हेमंत राजाराम - ३, अश्विनी निवास, तिसरा मजला, महात्मा फुले मार्ग, डोंबिवली (पश्चिम), जिल्हा : ठाणे – ४२१२०२
भ्रमणध्वनी : ८१६९७ १९३८९

**काव्यसंग्रह :** तुझ्याहोडीत (शासन अनुदान प्राप्त), 'अमृताचा अनुभव' – श्रीज्ञानदेवांच्या अमृतानुभवाचा छंदानुवाद (२००८)

**आगामी:** 'निळया नभाच्या डोळयादेखत' (रुबाई संग्रह)

**अध्यक्ष** – काव्यरसिक मंडळ, डोंबिवली. संत साहित्याचा अभ्यास, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या ग्रंथांचा अभ्यास. साहित्य संमेलन, आकाशवाणी, दूरदर्शन, मुशाय-यातून गझल सादरीकरण. दिवाळी अंक, दैनिके, मासिके, वृत्तपत्रातून कविता प्रसिद्धी.


अमृताची... अक्षयाची... अक्षरांची ... पालखी
गजल म्हणजे गच्च ओल्या भावनांची पालखी

ताजसम पृथ्वीवरी ह्या, आठवे आश्चर्य ती...
गजल म्हणजे, तर अलौकिक वेदनांची पालखी

हीर-रांझा, मजनु-लीला, कृष्ण-राधा... तर कधी
गजल मीरेच्या मनीची, यातनांची पालखी

वेद, रामायण, महाभारत... तथा कुरआनही
गजल शांतीची, सुखाची, चेतनांची पालखी

श्रावणाचा मास, वासंतिक बहर, वर्षा ऋतू
गजल 'एके' उत्सवांची अन सणांची पालखी



SBI

Welcome to SARAL

SUDHAKARRAO KULKARNI SMRUTI PR

15-Apr-2020 [06:39 PM

You are here: / Payments / Transfers / VAN Funds Transfer

## VAN Transfer

**e-PayOrder Details**

| | |
|---|---|
| e-PayOrder Number | CQ00147749 |
| Transaction Type | VAN Transfer |
| Debit Status | Success |
| Description | Completed Successfully |
| Counterfoil Description | DONATED PM CARES COVID 19 |

Date 15-Apr-2020

PAY 2121PM20202

RUPEES (in words) Ten Thousand only Rs. 10,000.00

ACCOUNT NO 00000037929623665

STATE BANK OF INDIA
AUSA ROAD LATUR

SKSMRUTIP
MAKER

"CQ00147749"

Transaction authorized after 20:00 HRS IST may be reflected in the account statement on the next day. Please check your account statement for the value date of this transaction.

**Dated : 15/04/2020**
**GRN : 032520202021E**

सत्यमेव जयते

MAHARASHTRA

## CHIEF MINISTER'S RELIEF FUND

CMRF-COVID 19

**RECEIVED with thanks from M/S SK SMRUTI PRATISHTHAN , 14 PLATINUM APARTMENTS, 14, Platinum Apartments, Desai Nagar, Opposite MRF, Latur (M Cl), Latur, District - Latur, Maharashtra, PIN - 413512**

The sum of Rupees Five Thousand ( Rs.5000.00 ) only by Online Payment.
Government Receipt Number - 032520202021E Transaction Id - CHD4692220 Dated - 15/04/2020.
Collected by STATE BANK OF INDIA,MAIN BRANCH (FORT, MUMBAI)

For General Secretary,
Chief Minister's Relief Fund
Mantralaya, Mumbai - 400 032.

**Eligible for 100% exemption from Income Tax u/s 80(G)(2)(iii hf) of Income Tax Act, 1961.**
**Exempted from Stamp Duty under proviso to section 3 of the Bombay Stamp Act, 1958.**
**CMRF PAN: AAATC0294J TAN: MUMC16959F**



# सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान

**नोंदणी क्र.** – Latur/0000014/2018 (संस्था नोंदणी अधिनियम, १८६०) दि. १६.०१.२०१८

व F-0024903 (LTR) (मुंबई सार्वजनिक विश्वस्तसंस्था अधिनियम, १९५०) दि. ०९.०३.२०१८

१२ – अ प्रमाणपत्र प्राप्त. 80 G प्रमाणपत्र प्राप्ती. प्रतिष्ठानला मिळणाऱ्या सर्व देणग्या आयकर सवलतीस पात्र.

## स्थापनेपासून आयोजित कार्यक्रम / उपक्रम -

१. सुधाकरराव कुलकर्णी यांचा स्मृतीदिन – मूक बधीर विद्यालयात श्रवणयंत्रांचे वाटप. (२५.०१.२०१८) - अंबाजोगाई

२. अभ्यासक्रमातील बदलांवर शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ यांचा परिसंवाद (०१.०४.२०१८)

३. मानव संसाधन मंत्रालयाने केलेल्या जाहीर सूचनेनुसार या परिसंवादातील सूचना सादर.

४. सुरेश भट यांचा स्मृतीदिन – गझल मुशायरा (१५ एप्रिल, २०१७ पासून दरवर्षी )

५. ग्रामीण भागातील ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांना गणित, इंग्रजी व विज्ञान विषयांच्या तज्ज्ञांचे विशेष मार्गदर्शन व शैक्षणिक साहित्य म्हणून शब्दकोशांचे वितरण (१४.०७.२०१८) सरस्वती विद्यालय, पानगाव

६. 'मुली वयात येताना' – किशोरवयीन मुलींसाठी वैद्यकीय मार्गदर्शन – पानगाव – सुमारे ४०० मुलींचा मेळावा. उजनी (ता. अंबाजोगाई जि. बीड) – सुमारे १२० मुलींचा मेळावा.

७. फटाक्यांच्या नियंत्रित वापराबाबत आवाहन पत्रक – १०००० पत्रकांचे वाटप.

८. मराठी विज्ञान परिषदेच्या विभागाची स्थापना – 'दर शनिवारी – विज्ञानवारी' ह्या उपक्रमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी विज्ञान प्रसारक पथकांच्या सप्रयोग वैज्ञानिक सत्रांचे आयोजन.

९. शिक्षणविषयक विशेष दिवाळी अंकांचे शाळांतून वाटप.

१०. सॅनिटरी पॅड वितरण यंत्राची भेट तिरुपती विद्यालय, पानगाव (०३.०१.२०१९)

११. किशोरवयीन विद्यार्थिनींच्या विशिष्ट आरोग्यविषयक समस्यांचे सर्वेक्षण.

१२. समाजकार्योत्सुक होतकरू तरुणांचा मेळावा.

१३. ग्रामीण भागातील सेवादक्ष शिक्षकांचे दरवर्षी सन्मान. आजवर बारा शिक्षकांचे सन्मान.

## दि. १ मे, २०२० – महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून www.skspratishthan.com या संकेतस्थळाची सुरुवात होणार.

<u>पुढील कार्यक्रम / उपक्रम</u>

१. इतर इच्छूक संस्था व उपक्रम यांच्याशी समन्वय व संयुक्त कार्यक्रम / उपक्रम आखणे. (अभिजात फिल्म सोसायटी, कलापंढरी, अभंग प्रतिष्ठान इ.)

२. पानगाव व परिसरातील ग्रामीण भाग, खेडी, वाड्या यांचे सर्वेक्षण करणे.

३. किशोरवयीन मुली व त्यांच्या माता यांच्या सातत्यपूर्वक वैद्यकीय मार्गदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करणे.

४. आदर्श शिक्षक पुरस्कार योजनेसंबंधी निर्णय / कार्यान्विकरण.

५. मराठी गझल क्षेत्रात अभिनव कार्यक्रमांचे आयोजन करणे.

६. वृक्षारोपण, रक्तदान, अवयवदान इ. बाबतीत जनजागृती करणे.

७. वाहतूक व रहदारी नियमनास्तव संबंधित प्रशासकीय कार्यालयांशी साह्यभूत संलग्न उपक्रम राबवणे. नागरिकांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांतून अपघात निर्मूलन चळवळ राबवणे.

८. पानगाव व परिसरात महिलांसाठी शिवणकौशल्य , हस्तकलाकौशल्य यांद्वारे रोजगार निर्मिती योजना राबवणे. (एसएसटीसी महाविद्यालय, लातूर)

९. दुष्काळनिवारणविषयक उपक्रमात साह्यभूत सहभागित्वाचे नियोजन करणे.

१०. प्रतिष्ठानच्या प्रतिमाबांधणीस्तव घटनेतील उद्दिष्टांनुसार उपक्रम.

११. ग्रामीण भागातील सेवादक्ष शिक्षकांसाठी पुरस्कार योजना.